

माझें वेदतत्व जें का गुप्त। प्रणवरूपें हृदयाआंत। योगी सदा अनुभवित। त्याचें स्वरूप निश्चित अवधारी।।४।। जैसा कमलमृणाळ बिसतंत। तैसा सूक्ष्मनाद अत्यंत। नाभीपासोनि ब्रह्मरंध्रात। ओंकार स्वरांत लक्षिती।।५।। ऐसा ओंकाराच्या स्वराआंत। नाभीपासोनि ब्रह्मरंध्रात। सूक्ष्म नादाचा निजतंत। योगधारणा राखत महायोगी।।६।। हाचि नाद पै प्रस्तुत। लौकिकी असे भासत। दोन्ही कर्णी देता हात। तोचि घुमघुमित निजनादू।।७।। योगी म्हणती अनाहत शब्दू। वेदांती म्हणती सूक्ष्म नादू। आम्ही म्हणो हा शुद्धवेदू। असो अनुवादू हा नावांचा।।८।।

—एकनाथी भागवत, अध्याय २१

उर्णनाभि म्हणिजे कांतणी। जेवी निजमुखापासुनि। तंतु काढी अतिसूक्ष्मपणी। तेवी निर्गुणी ओंकार।।१४।। तो ओंकार होता सप्राण। सहजस्वभावे गा जाण। झाले हिरण्यगर्भ अभिधान। आपणिया आपण वेदाज्ञा।।१५।। ''प्रभु'' म्हणजे ऐश्वर्यख्याती। अचिंत्यानंत त्याची शक्ति। तो छंदोमय वेदमूर्ती। जाणनिश्चिती उद्धवा।।१६।। तो अविनाशी वास्तव स्थिती। नित्य सुखमय सुखमूर्ती। तेणें सप्राण नादाभिव्यक्ती। मन:शक्ति चेतवी।।१७।। चेतविली जें मन:शक्ती। होय स्पर्श स्वर वर्ण कल्पिती। वेदज्ञ बृहती म्हणती। जिचा अपरिमितीविस्तार।।१८।। तें स्वर वर्ण संवलित मंत्र। हृदयाकाशी विचित्र। सहस्त्रशाखीविस्तार। वाढली अपार वैखरी।।१९।।

—एकनाथी भागवत, अध्याय ४ था

**(ॐ) ओंकार: सर्वमंत्राणामुत्तम: परिकीर्तित:।**
**ओंकारेण प्लवेनैव संसाराब्धिं तरिस्यसि।।**

सर्व मंत्रामध्यें ओंकार श्रेष्ठ आहे. छांदोग्य उपनिषदांत ओंकार माहात्म्यवर्णन केलें आहें. ओंकार म्हणजे वेदत्रयीचें सार होय. ओंकारविद्या ही अक्षरविद्या आहे. अक्षर म्हणजे अविनाशी व अविनाशी म्हणजे परब्रह्म. **'ओमित्येकाक्षरंब्रह्म'** असा त्याचा महिमा आहे. ओंकार उपासनेनें साक्षात् अमृतत्वाची प्राप्ती होते. ओंकारालाच 'प्रणव' असें म्हणतात. 'नु' धातूचा अर्थ स्तुती करणें असा आहे. ह्या धातूला 'प्र' उपसर्ग लावून 'प्रणव' शब्द बनला आहे. याचा अर्थ स्तुती करणें असा आहे. जेथें शब्द पोहोंचत नाहींत, अशा परब्रह्माचें स्तवन करण्याचे हेतूने ऋषींनी सर्व संकेत ज्यात आहेत, अशा या ओंकाराचा प्रयोग केला आहे. **'तस्य वाचक: प्रणव:।'**

॰ हा ध्वनी परब्रह्माचा वाचक बनला आहे.


सर्व इंद्रियांचे रक्षण प्राण करतो. प्राण हा नि:स्वार्थ व निष्पाप आहे. प्राणाला ॰ नाहीं त्यामुळें मनानें होणारे पाप पुण्य त्याला नाहीं. ती फक्त एक शक्ती आहे. ॰ शक्तीने आपल्या शरीरांतर्गत क्रिया चालतात. 'प्रणव' हे प्राणाचें प्रतिक आहे. ॰ ध्वनीरूप आहे. प्राणाशिवाय ध्वनी उत्पन्न होऊं शकत नाहीं. सूर्य हा विश्वाचा ॰ आहे. **'सूर्य आत्माजगतस्तत्सुसश्च'**। प्राण व सूर्य यांची उपासना ॰कारारूपांत करावी असें शास्त्रांत वर्णन आहे.

वेदमंत्र हें ॐकार पूर्वक उच्चारले जातात. सर्व विश्व ॐकारात सामावले आहे. इच्छा, शक्ती व मोक्षप्राप्ती सर्वच ज्यात सामाविष्ट होते, अशा ओंकाराचें योगी सतत ध्यान करतात.

ज्याची वृत्ती वैराग्यमय बनली आहे, तोच ओंकाराच्या उपासनेचा अधिकारी ॰ला जातो. ओंकार उपासनेनें कांहीं शारीरिक लाभ होत असले तरी ती उपास्य म्हणून सार्वजनिक होऊ शकत नाहीं. ओंकार जपाचा अधिकार सर्वांना नाहीं. खऱ्या अर्थानें संन्यासी झालेल्या साधकास फक्त ॐच्या जपाचा अधिकार आहे. सामान्य उपासकांनी **ॐ नमो भगवते वासुदेवाय। ॐ नम:शिवाय** असें जप करावे. उपासकाला विशिष्ट अधिकार (वैराग्यादि) प्राप्त झाल्यावरच ओंकारासारखे जप सांगितले आहेत, सर्वसामान्यांकरिता नाहींत. **अधिकार तैसा करूं उपदेश। साही ओझे त्यास तेचि द्यावे। आपला अधिकार पाहूनच कार्य करावे।** असा शास्त्राचा दंडक आहे.

सारांश, ॐकार परब्रह्माचें प्रतिक आहे. ब्रह्मविद्येचा समग्र अर्थ ओंकारांत संकलित झाला आहे. ओंकाराच्या तीन मात्रांनी समग्र सृष्टीला सामावून घेऊन शेष उरलेल्या अर्ध्या मात्रेनें सृष्टीकार्याला स्वत:मध्यें सामाविष्ट करून घेतले आहे. ॐकार हें प्राण, वेद व परब्रह्म ह्यांचे प्रतिक आहे. ओंकाराचा खऱ्या अर्थानें आपणास बोध झाला तर आपण कृतकृत्य होऊ. उपनिषदांनी त्याचें माहात्म्य खालीलप्रमाणें वर्णन केले आहे.

**"ओंकार प्रभवा देवा ओंकार प्रभवा स्वरा:।**
**ओंकार प्रभवं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम्॥**



## जुन्यातलं सोनं

# श्रीसाई गाथामृत

## राधाकृष्ण माई

(श्री साईलीला, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर १९५५ अंकावरून)

लेखक – **ना. वा. गुणाजी**

श्री साईबाबा शिरडी संस्थान या संस्थेची वाढ दिवसेंदिवस एकसारखी वाढत चालली आहे. तेव्हां ज्या व्यक्तीनें या संस्थेला संस्थानचें स्वरूप आणलें किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे शिरडी संस्थानचा पाया घातला, त्या व्यक्तीची म्हणजे कै. श्रीराधाकृष्णमाईची गाथा किंवा कथा प्रथम सांगणें हें योग्य होईल. पण दुर्दैवाची व दुःखाची गोष्ट ही कीं, त्यांच्याविषयीं सविस्तर अधिकृत माहिती मिळत नाहीं, त्यामुळें त्यांची कथा सांगणें हें फार कठीण काम झालें आहे. त्यांच्याविषयीं जेवढी कांहीं माहिती श्री साईलीलेच्या मागील अंकांत व इतरत्र मिळाली ती एकत्र करून त्यांचें चरित्र देण्याचा येथें प्रयत्न केला आहे. ज्या कोणा साईभक्तांस त्यांचेविषयी अधिक विश्वसनीय माहिती असेल, त्यांनीं ती अवश्य प्रसिद्ध करावी अशी त्यांना सविनय विनंति करून प्रस्तुत कथा सुरू करीत आहें.

ह्या माईचें मूळ नांव सुंदराबाई क्षीरसागर असें होतें. अहमदनगरचे प्रसिद्ध वकील श्री. बाबासाहेब गणेश यांच्या या नात होत. त्यांना पंढरपूरच्या क्षीरसागर कुटुंबांत दिलें होतें. त्या वयाच्या १८-२० वर्षांच्या असतांना त्यांचे पति वारले तेव्हांपासून त्या सकेशा बालविधवा होत्या. त्या तरुण, देखण्या, सशक्त आणि काळ्यासांवळ्या वर्णाच्या होत्या. श्री बाबांची कीर्ति ऐकून इतर भक्त जसे शिरडीस येत असत तशा ह्याहि पंढरपूराहून कै. नानासाहेब चांदोरकर यांच्याबरोबर इ. स. १९०५-६ च्या सुमारास शिरडीस आल्या. त्यांना पत्र पाठवून कोणीहि शिरडीस बोलावून आणिलें नव्हतें. श्री बाबांची कीर्ति ऐकून त्या स्वयंस्फूर्तीनेंच शिरडीस येऊन राहिल्या. ह्यांची श्री बाबांवर अत्यंत प्रेमळ भक्ति असून त्यांनीं आपलें तन व मन त्यांना सर्वस्वीं अर्पण केलें होतें. शिरडीस आल्यापासून बाबांनीं त्यांना मशिदीची पायरी कधींहि चढूं दिली नाहीं, व त्या कधींहि मशिदींत आल्या नाहींत किंवा मशिदींत येण्याचा त्यांनीं

हट्ट किंवा आग्रह धरला नाहीं. बाबा हे आपल्या पूर्वजन्मीचे पति होत असें त्या बाबांची सेवा करीत असत आणि आपला चेहरा, सादर व विनयपूर्वक झांकून घेऊन तो कधींहि बाबांना दाखवीत नसत. बाबाहि ही पूर्वजन्मीं ल्याजवळ होती, पण आपण तिला कधीं शिवलों नाहीं असें म्हणत, असें बाबाचे वर्ति भक्तसखे शामा (माधवराव देशपांडे) सांगत होतें. बाबा त्यांना योग्य मान आणि मशिदीसमोर थोड्या अंतरावर असलेल्या एका लहानशा घरांत त्यांची व्यवस्था केलेली होती. बाबा त्यांना दररोज एकवेळां दुपारीं, आलेल्या कांहीं भाग आणि नैवेद्यापैकीं एक भाकरी व थोडीशी भाजी, माधवराव पांडेबरोबर पाठवीत असत. बाबांकडून जी कांहीं भाजीभाकर येई तोच प्रसाद मानून त्यावरच राहात आणि बाबांच्या पायांचें तीर्थ मिळवून त्यांचा पाण्याऐवजीं उपयोग . श्रीयुत एम्. बी. रेगे किंवा श्री. र. भा. पुरंदरे किंवा दुसरे नेहमींचे पाहुणे असले म्हणजे बाबा त्यांना अधिक भाकरी भाजी पाठवीत असत. ह्या शिरडीस त्यापासून बाबांना नित्यनेमानें पांच गोविंद विडे व कुटलेले विडे पाठवीत व त्यांपैकीं लेला विडा बाबा रोज दुपारच्या भोजनानंतर खात आणि वर पाणी पीत.

**नामाभिधान -** यांचेजवळ एक लहानशी धातूची गोपाळकृष्णाची मूर्ति असे. मूर्तीस त्या अहोरात्र आपल्याजवळ बाळगीत असत आणि त्यांच्या मुखांत कृष्ण हें नांव निरंतर असे. त्यामुळेंच त्यांना राधाकृष्णी हें नांव पडलें असावें. हि त्यांचेविषयीं उल्लेख करितांना रामकृष्णी किंवा राधाकृष्णी असाच करीत.

**त्यांची कामगिरी -** तूं हें अमुक काम माझ्याकरितां कर किंवा माझ्या अमुक ची व्यवस्था ठेव असें बाबा त्यांना कधींहि सांगत नसत, इतकेंच नव्हे तर त्यांचें हि पाहत नसत किंवा त्यांचेशीं एक शब्दहि बोलत नसत, आणि त्यांना मशिदींतहि देत नसत. तेव्हां बाबांची किंवा त्यांच्या संस्थानची-भक्तांची जी कांहीं सेवा कामगिरी करावयाची ती सर्व त्या स्वयंस्फूर्तीनें अंत:करणापासून करीत आणि भक्तमंडळीकडून करून घेत. बहुतेक सर्व भक्तवृंदावर त्यांची छाप असल्यामुळें भक्त त्यांनीं सांगितलेली कामगिरी सहसा अमान्य करीत नसत.

बाबा हे प्रथम जेव्हां शिरडीस आले तेव्हां बरेच दिवस ते कोणापाशीं दक्षिणा नसत, किंवा कोणी त्यांना ती देत नसत. ते एका पडित जुन्या पुराण्या (पण जीर्णोद्धार केलेल्या) मशिदींत रहात असत. मोहिद्दीनभाई तांबोळी आणि बाबा मध्यें कांहीं तेढ पडून उभयतांमध्यें झोंबाझोंबी होऊन त्यांत बाबा हरल्यावर बाबांनीं पला अवघा पोषाख बदलला. 'कफनी ओढिली लंगोट लाविला। फडका ळिला माथ्यास।।५.६६।। केलें गोणाचें वरासन। गोणाचेंच अंथरूण।। फाटकें तुटकें

करोन परिधान। त्यांतचि समाधान मानावे॥५.६७॥ –श्रीसाईसच्चरित. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे आसन किंवा बैठक फाटक्या तरटाची, माथ्यावर एक पांढरें फडकें, – डाव्या कानावरून पाठीमागें जटेप्रमाणें सोडलेलें, एक लंगोटी, एक पायघोळ कफनी, एक खापर, एक टमरेल हीच त्यांची जिंदगी होती; आणि गांवांत चार पांच घरें 'भवति भिक्षां देहि' मागून ते आपला उदरनिर्वाह करीत. चिलमीस तंबाखू, धुनीस लांकडें आणि दिव्यास तेल इतकेंच काय तें गांवांतून मागून आणीत. द्रव्याची त्यांना गरज किंवा अपेक्षा नव्हती. बाबा ही काय अमोलिक चीज आहे याची जाणीव बरेच वर्षें लोकांना नव्हती. हा एक फकीर आहे असें लोक समजत. पण पुढें श्री. नानासाहेब चांदोरकर हे आणि त्यांचे इतर स्नेही बाबांच्या दर्शनास येऊं लागल्यापासून आणि त्यांनीं बाबांची प्रसिद्धी केल्यापासून भक्तांची गर्दी एकसारखी वाढूं लागली. चोहोंकडून सर्व प्रकारचे व जातीचे भक्त बाबांच्या दर्शनास येऊं लागले आणि अनेक तऱ्हेच्या भेटी व दक्षिणा देऊं लागले आणि बाबाहि दक्षिणा मागूं लागले.

राधाकृष्णमाई शिरडीस आल्यापासून बाबांची पूजा व आरती होऊं लागली आणि आरतीच्यावेळी अबदागीर, चवऱ्या, छत्रचामरें बाबांवर ढाळूं लागलीं. बाबा एक दिवसाआड चावडींत झोंपावयास जाऊं लागले. ते चावडींत जातांना वाजत गाजत, घोडा (शामकर्ण), पालखी, चोपदार, भजनकरी मंडळी, गरुडटके, पताका वगैरे इतमामानिशीं जात असत. तेव्हां रात्रीं बाबांची शेजारती व पहांटे काकडआरती सुरू झाली. त्यांचीं सर्व व्यवस्था राधाकृष्णमाईंकडेच असे. चावडीची मिरवणूक निघाल्यावर ह्या स्नान करून पांच दिवे कंदिलांत ठेवून, स्वत: पांढरें पातळ नेसून तोंडावर बुरखा घेऊन तो कंदील मशिदीच्या पायरीवर ठेवून नमस्कार करून परत जात.

बाबा चावडींत झोंपावयास जाऊं लागल्यामुळें ती आरसे, हंड्या झुंबरें आणि तसबिरी इत्यादिकांनीं सजली गेली. पूजेच्या, आरतीच्या आणि चावडीच्या मिरवणुकीच्या कामासाठीं, तसेंच गुरुपौर्णिमा, गोकुळाष्टमी आणि रामनवमी इत्यादि लहान मोठ्या उत्सवासाठीं, चांदीची भांडीं, मौल्यवान् वस्त्रेंभूषणें, गॅसचे सुंदर लहान मोठे दिवे आणविण्याची व सर्व तयारी करून घेण्याची सर्व कामगिरी राधाकृष्णमाई श्रीमान् भक्तांकडून करवून घेत. बाबांना या सर्व इतमामाची मनापासून इच्छा किंवा अपेक्षा नसे. ते हें सर्व नको नको म्हणत असत व शिव्याशाप देत असत आणि रागावत असत. श्री. नानासाहेब चांदोरकरांना ते नेहमीं सांगत असत, आपली खरी इस्टेट किंवा ऐश्वर्य म्हणजे फाटकें तरट, माथ्यावरील पांढरें फडकें, पायघोळ कफनी, एक खापर, चिलीम, तमाखू, टमरेल, सटका (लहान सोटा) इतकेंच काय तें. पण भक्तलोक अनेक अनावश्यक व निरुपयोगी वस्तु, बहुमोल आभरणें वगैरे वगैरे आणून

आपणाला व्यर्थ त्रास देतात–त्यांची मुख्य शिकवण अशी असे कीं:–

गरीबी अव्वल बादशाही। अमीरी से लाख सवाई।।
गरीबों का अल्ला, भाई। अक्षयीं साई वदत कीं।।

श्रीसाईसच्चरित ५.६८

अशी स्थिति असतां बाबानीं हें सर्व अवडंबर, राधाकृष्णमाईना आणि इतर भक्तांना कां करूं आणि वाढू दिलें असा प्रश्न येतो आणि हा विचारार्ह आहे असें मला वाटतें. कांहीं वर्षांमागें मुंबईस जाण्यासाठीं मी बेळगांव स्टेशनवर गाडींत बसलों होतों. स्टेशनच्या प्लॅटफार्मवर अतिशय गर्दी होती. एका साधूच्या गळ्यामध्यें फुलांचे हार माळा घालून भक्तगण नमस्कार करीत होता. असें अवडंबर हे साधुलोक कां माजवितात असा प्रश्न माझ्या डोक्यांत आला आणि हे साधु खरे साधु नसून मानपानाला हापापलेले ढोंगी साधु असावे असें मला वाटलें. गाडी सुटण्याच्या वेळीं ते साधु आमच्या डब्यांत माझे शेजारीं बसले आणि तो सर्व फुलसंभार खालीं काढून ठेवून म्हणाले कीं, — हें सर्व मला नको आहे, पण भक्तांना नाखुष कसें करावयाचें, त्यांच्या प्रेमापुढें आणि भक्तीपुढें माझें कांहीं चालत नाहीं. हे त्यांचे अंतरोद्गार ऐकून माझा त्या साधूविषयींचा ग्रह बदलला आणि थोड्याशा सहवासानंतर आणि संभाषणानंतर आम्हां उभयतांमध्यें मैत्री आणि प्रेमभाव उत्पन्न झाला. या दृष्टीनें पहातां वरील साईभक्तांचा थाट, सोहळा, समारंभ इत्यादिकांचा विचार करतां त्यांत बरीच उपयुक्तता आहे आणि त्याचा त्यावेळीं आणि पुढेंहि उपयोग झाला व अद्यापहि होत आणि वाढत आहे असें थोड्याशा विचारान्तीं दिसून येईल. श्री बाबांची इच्छा नसतांना, इतकेंच नव्हे तर उलट इच्छा असतांनासुद्धां राधाकृष्णमाई आणि इतर भक्त यांनीं त्या वेड्या फकिरांना महाराज, राजयोगी आणि शेवटीं देवहि बनविला. श्री बाबा हे मूळचे देवच होत हें खरें, पण देवांचें देवपण भक्तांकडूनच प्रगट होत असतें. तसांच हा प्रकार झाला. या समारंभामुळें व अवडंबरामुळें लोकांची बाबांच्या ठायीं भक्ति स्थिरावली, दृढ झाली, वाढली आणि फैलावली. तेव्हांपासून बाबांच्या भक्तीचा प्रसार एकसारखा उत्तरोत्तर वाढत आहे हें आरशासारखें स्पष्ट आहे.

**त्यांची निष्काम सेवा**- त्यांची रोजची मुख्य कामगिरी म्हणजे मशिदीपासून लेंडीस शौचास जाण्याचा बाबांचा रस्ता झाडून साफ करणें ही होती. आपल्या निधनापर्यंत त्यांनी ही सेवा स्वखुषीनें आणि मोठ्या आनंदानें केली; त्यांचेनंतर ही कामगिरी बाबांचा एक निस्सीम भक्त अबदुलभाई करूं लागला. बाबा रोज मशिदींतून साठे-नवलकर यांच्या वाड्यापर्यंत फिरावयास आणि हातवारे करावयास जात.

त्यावेळीं त्यांना ऊन लागूं नये म्हणून आणि पूजेसाठींहि फुलें सहज मिळावीं म्हणून तितक्या रस्त्यावर लोखंडी कमान बांधून त्यावर सुवासिक पुष्पवेली लावण्याची कामगिरी, – बाबा नको नको म्हणत असतां आणि शिव्याशाप देऊन रागें भरत असतां साईभक्त श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे यांच्या साहाय्यानें त्यांनीं करून घेतली. तसेंच मशिदीची दुरुस्ती, पागा बांधणें इत्यादि जरूरीचीं कामेंहि त्यांनी याप्रकारें करून घेतलीं.

त्या शिरडीस अदमासें ९।१० वर्षें राहिल्या आणि १९१६ सालीं आपल्या वयाच्या ३४।३५ व्या वर्षीं त्यांनीं आपला अवतार शिरडीसच संपविला. त्या प्रेमळ, मनमिळाऊ आणि अति कर्तृत्ववान असल्यामुळें त्यांनीं या मुदतींत ९।१० वर्षांत जी कांहीं शिरडी संस्थानची कामगिरी केली आणि भक्तवृंदाकडून करून घेतली, तितकी कामगिरी इतर साधारण भक्तांना वीस पंचवीस वर्षांतहि करतां आली नसती.

### राधामाईचें निवासस्थान म्हणजे परमार्थ शाळा

श्री बाबा प्रथम बरींच वर्षें भक्तांकडून कांहीं दक्षिणा मागत असत. पुढें राधाकृष्णमाईच्या आगमनानंतर ते दक्षिणा मागूं लागले आणि ती गोडीगुलाबीनें आणि केव्हां केव्हां आग्रहानेंहि वसूल करून घेऊं लागले. कनक (वित्त) आणि कामिनी (स्त्री) या दोन परमार्थ मार्गांत विघ्नें किंवा कसोटचा मानल्या जातात. या दोन कसोटयांमधून आम्हीं पार पडलों म्हणजे आमचा परमार्थांतील पुढील मार्ग सुगम होतो. शिष्यांची, भक्तांची कसोटी पहाण्यासाठीं बाबांनीं या दोन्ही संस्था – कनक कामिनी शिरडींत ठेविल्या होत्या. भक्तांकडून प्रथम दक्षिणा मागून ते या कसोटींतून कसे काय उतरतात तें पाहून बाबा त्यांना शाळेंत जाण्यास सांगत असत. शाळा म्हणजे राधाकृष्णमाईचे निवासस्थान. तेथें जाऊन आणि राहून भक्त दुसऱ्या कसोटींतूनहि पार पडले म्हणजे त्यांचा परमार्थपथ सुकर होत असे आणि बाबांच्या कृपेनें आणि आशीर्वादानें त्यांची आध्यात्मिक उन्नति लवकर होत असे.

**राधाकृष्णमाईचा अधिकार** - राधाकृष्णमाई ह्या बाबांच्या प्रेमळ, उत्कट, निस्सीम आणि अनन्यभक्त होत्या. त्यांनीं बाबांची आणि त्यांच्या संस्थानची निष्काम, निस्सीम आणि मनोभावें स्वतः सेवा केली आणि इतर अनेक भक्तांकडून करून घेतली हें सर्वश्रुत आहे. आणि यामुळें त्यांचा परमार्थांतील अधिकार फार मोठा व उच्च दर्जाचा झाला होता. भक्त या नात्यानें त्यांचा व बाबांचा काय संबंध होता हें बाबांनाच माहीत. 'शाळेंत जा' या बाबांच्या सांगण्याप्रमाणें पुष्कळ भक्त त्यांचे बिऱ्हाडीं जात असत. केव्हां केव्हां मशिदीपेक्षां 'शाळेंत'च अधिक गर्दी होत असे आणि कांहीं भक्त तर त्यांना बाबांच्या कोटींत बसवीत म्हणजे त्यांना बाबांसारखे मानीत. कित्येकांना

हे अतिशयोक्ति आहे असें वाटण्याचा संभव आहे; पण त्यांत बरेंच तथ्य आहे हें खालीं दिलेल्या उदाहरणांवरून दिसून येईल.

(१) अलीकडे, कांहीं वर्षांमागें ज्यांनीं स्वत: अनेक साईभक्तांच्या भेटी घेतल्या आणि त्यांचे अनुभव (Devotees' Experiences) तीन भागांत प्रसिद्ध केले, ज्यांनी 'साईसुधा' इंग्रजी मासिक सुरू करून आज १५।१६ वर्षे चालविलें आहे, ज्यांनी 'ऑल इंडिया साईसमाज' स्थापन करून, सर्व देशभर फिरून आणि ठिकठिकाणीं व्याख्यानें देऊन आणि अनेक ग्रंथ लिहून, ज्यांनीं साईभक्तीचा जोरानें प्रसार चालविला आहे असें सालेम-मद्रासचे विद्वान् गृहस्थ (सुप्रसिद्ध साईभक्त) श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी यांनीं नुकताच Life of Saibaba Vol I, हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यांत त्यांनीं पान १५० येथें राधाकृष्णमाईविषयीं असा उल्लेख केला आहे कीं-

'Shri P. R. Avasthi, was with difficulty persuaded to go along with Shri M. B. Rege, and see Sai Baba and Ramkrishna Ayi (who had developed some psychic-powers and was acting as Guru to some) at Shirdi.'

याचा अर्थ– 'श्री. पी. आर. अवस्थी यांचें मन, श्री. एम्. बी. रेगेसह शिरडीस जाऊन बाबाचें आणि (जिनें कांहीं मानसिक सिद्धि मिळविल्या होत्या आणि जी कांहीं जणांना गुरुस्थानीं होती अशा) राधाकृष्णमाईचें दर्शन घेण्याविषयीं वळविले होतें.'

(२) श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामीच्या या विधानाला पुष्टिदायक पुरावा आहे. त्यांनी जे भक्तानुभवाचे तीन भाग प्रसिद्ध केले आहेत, त्यांपैकीं पहिल्या भागांत, पान ५ येथें, उत्तर भारतांतील एका संस्थानच्या एका हायकोर्ट न्यायाधीशानें, ११ जून १९३६ ला झालेला जो जबाब प्रसिद्ध झाला आहे, त्यांतील राधाकृष्णमाईविषयीं जी हकीकत दिली आहे ती येणेंप्रमाणें– जज्जसाहेब सांगतात कीं:–

'रामकृष्णीकडे जा आणि तेथें रहा' अशा बाबांच्या सांगण्याप्रमाणें मी केलें, त्या दिवसापासून त्यांच्या निधनापर्यंत मी शिरडीस जाई त्यावेळीं माझा मुक्काम त्यांच्याकडेच असे. माझ्या शिरडीच्या वास्तव्यांत बाबाचें दर्शन घेण्याकरितां मी त्यांच्या घरांतून बाहेर द्वारकामाईंत जावयाचा; एरवीं मी त्यांच्या बिऱ्हाडींच रहात असे.

(क्रमश:)

# वर्षा ऋतु

- वैद्य किरण पां. भावे, आयुर्वेदाचार्य,
मुंबई.

मागील लेखामध्ये वर्षा ऋतूची चर्या आपण पाहिली. वर्षा ऋतूमध्ये त्रिदोषांचा क्षोभ झालेला असतो. त्यामुळे आहार विहार अतिशय संयमाने घ्यावा लागतो. नाहीतर अनेक रोगांना आमंत्रण दिल्यासारखे होते व कावीळ, अतिसार, आंव, दमा, संधिवात यांसारखे रोग डोके वर काढतात. ह्या रोगांचा प्रतिकार होण्यासाठी किंवा हे रोग होऊच नयेत म्हणून आपण वर्षा ऋतूचा आहार विहार मागील लेखामध्ये पाहिला.

एवढे करूनही रोग झालाच तर त्यावर काय उपाय करावेत ह्या विषयी आपण थोडक्यात पाहू. सर्व उपाय घरी करता येण्यासारखे आहेत. त्यातील अतिसार किंवा जुलाब होणे या संबंधी थोडे पाहू.

हा रोग होण्याची कारणे—जास्त प्रमाणात खाणे, अति जड, स्निग्ध, तेलकट, तिखट, एकावर एक सारखे खात रहाणे, कच्चे तसेच शिळे अन्न खाणे, अति मद्यपान, दूषित पाणी, संडासचा वेग येऊनही न जाणे, इत्यादी कारणांनी हा रोग होण्यास मदत होते.

ह्यामुळे सुरुवातीस छातीत, पोटात, गुदद्वाराशी वेदना होतात, पोट फुगते, त्यानंतर फेसाळ थोडा थोडा वात सरून शौचास होऊ लागते. पोटात मुरडल्यासारखे होते. हात पाय गळतात. त्यातील ताकद कमी होते. चक्कर येते. तहान लागते. काही वेळा रक्तही पडू शकते. अशा प्रकारची लक्षणे सामान्यपणे अतिसारात दिसून येतात.

ह्यावर पुढीलप्रमाणे उपाय योजण्यास सुरुवात करावी. आहारामध्ये मुगाचे पाणी, भाताची पेज, गोड ताक, डाळींबाचा रस, सफरचंद इत्यादींचा वापर करावा. पाण्यात लिंबू, साखर, मीठ व सूंठ घालून ते पाणी प्यावे. औषधांमध्ये सूंठ व गुळ एकत्र करून ते खावे. साधारणत: हरभऱ्याएवढी गोळी करून दिवसातून तीन ते चार वेळा घ्यावी. कुड्याचे पाळ ताकातून उगाळून २ ते ३ वेळा घ्यावे. साधारणत: पाव चमचा ओवा अर्क, २ चमचे पाण्याबरोबर ३ वेळा घ्यावा. ताकामध्ये हिंग, जिरे, सूंठ,

पिळी घालून ते प्यावे. तसेच कुटजारिष्ट २ चमचे पाण्याबरोबर ३ वेळा घेण्यास आहेच हरकत नाही. आंव पडणे या विकारातही सामान्यत: लक्षणे अशा प्रकारचीच असतात. त्यामध्ये फक्त शौचास मलाबरोबर चिकट फेस पडतो. पथ्य तथा औषधे वरील अतिसाराप्रमाणेच घ्यावीत.

आता या ऋतूत होणाऱ्या काविळीबाबत पाहू. कावीळ ही प्रामुख्याने दूषित अन्न, पाणी, मद्यपान, अति तिखट-तेलकट पदार्थ सेवनाने होण्याची शक्यता असते. या रोगामध्ये रोग्याची त्वचा, नखे, नेत्र, मल, मूत्र ही पिवळी होतात. इतकेच नाही तर अशक्तपणा येतो, शक्ती क्षीण होते. अन्नाचा द्वेष उत्पन्न होऊन ते खाल्ले असता पचत नाही. काही वेळा यकृतास सूजही येते. ताप येणे, उलटया होणे इत्यादी लक्षणे या काविळीत दिसून येतात.

ह्या रोगामध्ये रोग्याने पथ्य प्रामुख्याने पाळावे. त्यामुळेच रोगी ५०% बरा होतो. शौचासला पांढरट होत असेल तर सौम्य विरेचक उदा. त्रिफळा चूर्ण इत्यादी घ्यावे. आरोग्यवर्धिनी १-१ गोळी २ ते ३ वेळा ह्या रोगात घ्यावी. सूतशेखर रस २-२ गोळ्या २ वेळा दूधाबरोबर घ्याव्यात. तसेच पुनर्नवासव, रोहितकारिष्ट, कुमारीआसव यापैकी कोणतेही आसवारिष्ट २-३ चमचे दिवसातून २-३ वेळा सुरू करावे. अडूळसा, गुळवेळ, त्रिफळा, कुटकी, कडूचिराइत यांचा काढा करून तो घ्यावा. त्याचप्रमाणे पथ्यामध्ये गरम पाणी, दूध, भात, पालेभाज्या, दुधीची भाजी इत्यादींचा वापर करावा. उसाचा रसही घेण्यास हरकत नाही. तेल, तूप, लोणी, तिखट असलेले पदार्थ, कडधान्यांच्या उसळी, गहू यांसारखे पचावयास जड पदार्थ वर्ज्य करावेत. रात्रीचे जागरण, उन्हात फिरणे ह्या गोष्टी टाळाव्यात.

वर सांगितल्याप्रमाणे आचरण ठेवल्यास वर्षा ऋतूतील संभाव्य व्याधींपासून बचाव करता येईल. त्यांतूनही व्याधि झाल्यास तज्ज्ञ वैद्याचा सल्ला घेऊन मगच उपचार करावेत. हल्लीच्या धावपळीच्या जीवनांत सर्वच गोष्टींचे काटेकोरपणे पालन करणे नेहमी शक्य होतेच असे नाही. तथापि जमतील तेवढ्या गोष्टी आचरणांत आणून वैद्य किंवा डॉक्टर यांच्या कचाटयात सापडू नये याची खबरदारी घ्यावी. ऋतु बदलतांना होणाऱ्या परिणामांची माहिती आपण पुढच्या लेखात पाहू.



# सप्टेंबर १९९० - विशेष

| तारीख | वार | | विशेष |
|---|---|---|---|
| १ | शनिवार | – | परिवर्तिनी एकादशी, वामन जयंती |
| २ | रविवार | – | श्रवणद्वादशी, परिवर्तनोत्सव, प्रदोष, दधिव्रतसमाप्ति, पयोव्रतारम्भ |
| ३ | सोमवार | – | अनंत चतुर्दशी, ओनम (केरळ) |
| ४ | मंगळवार | – | अनंत चतुर्दशी, इन्द्रपौर्णिमा, प्रौष्ठपदी पौर्णिमा |
| ५ | बुधवार | – | महालयारम्भ, भागवतसप्ताह समाप्ति, फल्गुस्नानारंभ |
| ८ | शनिवार | – | संकष्ट चतुर्थी |
| ९ | रविवार | – | भरणीश्राद्ध, माधवदेव पुण्यतिथि (आसाम) |
| १० | सोमवार | – | चेलम (मु) |
| ११ | मंगळवार | – | कालाष्टमी |
| १२ | बुधवार | – | अविधवानवमी |
| १३ | गुरुवार | – | सूर्याचा उत्तरानक्षत्रप्रवेश |
| १५ | शनिवार | – | इंदिरा एकादशी, सन्याशांचा महालय |
| १६ | रविवार | – | प्रदोष, कलियुगादि, रवि कन्याराशीप्रवेश |
| १७ | सोमवार | – | शिवरात्रि, विश्वकर्मापूजा, मघाश्राद्ध, शस्त्रहतांचे शास्त्र |
| १८ | मंगळवार | – | सर्वपित्री अमावास्या, फल्गुस्नान समाप्ति |
| १९ | बुधवार | – | आश्विन, शारदीय नवरात्रारम्भ, घटस्थापना, मातामहश्राद्ध |
| २० | गुरुवार | – | ज्यूंचा वर्षारंभ–५७५१ |
| २१ | शुक्रवार | – | रबिउल अव्वल |
| २२ | शनिवार | – | विनायक चतुर्थी |
| २३ | रविवार | – | ललितापंचमी, विषुव दिन, भारतीय आश्विन |
| २६ | बुधवार | – | सरस्वती आवाहन, ओळी |
| २७ | गुरुवार | – | दुर्गाष्टमी, सरस्वतीपूजन, महालक्ष्मीजागर, महाष्टमी, रवि हस्तनक्षत्र प्रवेश |
| २८ | शुक्रवार | – | महानवमी, खण्डेनवमी, शस्त्रपूजा, सरस्वती बलिदान |
| २९ | शनिवार | – | विजयादशमी, दसरा, सरस्वती विसर्जन, शमी-पूजन, सीमोल्लंघन, अपराजितापूजन, बौद्धजयंती, मध्वजयंती, श्री साईबाबा पुण्यतिथि, शिरडी यात्रा |
| ३० | रविवार | – | पाशांकुशा एकादशी, भरत मिलाप |

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३६.०० | १२.०० |
| २. | —''— | इंग्रजी | १६.०० | १०.०० |
| ३. | —''— | हिंदी | १६.७५ | —''— |
| ४. | —''— | गुजराथी | २४.०० | ११.०० |
| ५. | —''— | कन्नड | १३.५० | १०.०० |
| ६. | —''— | तेलगु | १९.५० | —''— |
| ७. | —''— | तामीळ | २७.०० | —''— |
| ८. | —''— | सिंधी | २२.०० | —''— |
| ९. | श्री साईसत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.७५ | १०.०० |
| ११. | —''— | हिंदी | १२.५० | —''— |
| १२. | —''— | गुजराथी | ६.६५ | —''— |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ७.०० |
| १५. | —''— | हिंदी | १.०० | —''— |
| १६. | —''— | गुजराथी | ०.९० | —''— |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०.५० | —''— |
| १८. | —''— | हिंदी | १.२५ | —''— |
| १९. | —''— | गुजराथी | ०.९५ | —''— |
| २०. | —''— | तेलगु | ३.५० | —''— |
| २१. | —''— | सिंधी | १.२५ | —''— |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | २.५० | —''— |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६.८० | —''— |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १.५० | —''— |
| २५. | —''— | इंग्रजी | १.८५ | —''— |
| २६. | —''— | हिंदी | १.५० | —''— |
| २७. | —''— | गुजराथी | १.६५ | —''— |
| २८. | —''— | तेलगु | २.०० | —''— |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | —''— |
| ३०. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.०० | —''— |
| ३१. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४.५० | —''— |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | —''— |
| ३३. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५.२५ | १०.०० |
| ३४. | स्तवनमंजरी | इंग्रजी | १.१० | ७.०० |

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४" X २०" | २.०० | ७.०० |
| २. | —"— | पोष्टकार्ड | ०.२५ | —"— |
| ३. | —"— | २" X ३" | ०.१० | —"— |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४" X २०" | २.०० | —"— |
| ५. | —"— | १०" X १४" | १.१५ | —"— |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४" X २०" | १.७५ | —"— |
| ७. | —"— | १०" X १४" | १.१० | —"— |
| ८. | —"— | ७" X १४" | ०.५० | —"— |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४" X २०" | २.०० | —"— |
| १०. | —"— | १०" X १८" | १.१५ | —"— |
| ११. | —"— | ७" X १०" | ०.६० | —"— |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० | —"— |
| १३. | पालखी (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.२५ | —"— |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७" X १०" | ०.६० | —"— |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४" X २०" | १.४० | —"— |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :-**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ


अध्यक्ष

**डॉ. लेखा पाठक**

श्री. हेमराज शहा

श्री. ब्रिजमोहन भामशा

श्री. शिवराम शिंदे

डॉ. एकनाथ गोंदकर

श्री. भीमाशंकर खांबेकर

श्री. दादासाहेब रोहमारे (पाटील)

श्री. उत्तमराव शेळके

श्री. कारभारी देवकर

श्री. मोतीराम पवार

प्रा. ना. स. फरांदे

श्री. दिलीप अ. शिंदे

श्री. श्रीपतराव जाधव

श्री. मनोहर गोमटे

श्री. पृथ्वीराज ग. आदिक

श्री. राजीव प्र. कुळकर्णी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. बाबुराव नरोडे (पाटील)

श्री. प्रभाकर वी. बोरावके

श्री. सोपान धोरडे

श्री. अनंतकुमार पाटील

श्री. प्रशांत व्यं. हिरे


श्री. अण्णासाहेब म्हस्के

श्री. गोपिनाथ ब. कोते (पाटील)

श्री. मोहन मो. जयकर

Licence to Post Without Prepa
at Dadar Head Office, Bomba
Regd.: No. MH/BY
LICENCE N

# श्रीकृष्ण जयंती - १३.८.१९९०



मुद्रक : श्री. एम. डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.

सप्टेंबर १९९०)          (किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक





# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक
श्री साईबाबांच्या
दिव्य संदेशाचा प्रसार


र्ष ६९ वे) सप्टेंबर १९९० (अंक ६ वा

भारतीय भाद्रपद शक १९१२


संपादक

के. पं. क्षीरसागर

कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

★ कार्यकारी संपादक ★

डॉ. वि. वा. सातपूरकर

शास्त्री, एम्.ए., पीएच्. डी., पंचांगकर्ता


—: कार्यालय :—

पोस्ट—शिरडी—४२३१०९, जिल्हा—अहमदनगर.

साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनि—४१२ २५ ६१

—वर्गणी—


वार्षिक— रु. १० परदेशीय रु. १५० तहहयात— रु. ३००

(टपाल खर्चासहित)

किरकोळ अंक— रु. २



या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही




# श्री साईलीला

वर्ष ६९ सप्टेंबर १९९० अंक ६

भाद्रपद शालिवाहन शक १९१२

शिवशक ३१७, विक्रमसंवत् २०४६

हिजरी १४११ फसली १३६०


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | रघुनाथ-सावित्री साईनाथ भजनमाला | – | ३ |
| २. | सद्‌विचार | – | ४ |
| ३. | संपादकीय | – | ६ |
| ४. | निमंत्रण (श्री पुण्यतिथी उत्सव) | – | ७ |
| ५. | श्री पुण्यतिथी उत्सव कार्यक्रम | – | ८ |
| ६. | श्री साईभक्तांना नम्र आवाहन | – | ११ |
| ७. | श्री गणेशास अग्रपूजेचा मान | – वैद्यराज भाऊसाहेब कुळकर्णी | १३ |
| ८. | श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ८ वा | – श्री. मु. ब. निंबाळकर | २० |
| ९. | श्री दासगणूमहाराज व्यक्ति आणि वाङ्मय | – प्राचार्य शं. वा. दांडेकर | ३३ |
| १०. | श्रीसाई गाथामृत–राधाकृष्ण माई | – | ४२ |
| ११. | साईभक्तांचे अनुभव | – श्री. श. बा. पटवर्धन | ४३ |
| १२. | "आले तुझ्याच दारी" | – सौ. मीना वि. घुगे | ४९ |
| १३. | विष्णुसहस्त्रनाम | – | ५२ |
| १४. | संत नामदेव | – सौ. प्रविणा कांबळी | ५४ |
| १५. | जाते माहेराला | – मनोरमा पी. दीक्षित | ५७ |
| १६. | "हरि ॐ बाबा" | – | ५८ |
| १७. | साईकृपेच्या सावलीत | – | ५९ |
| १८. | हितगुज | – | ६१ |
| १९. | महिना विशेष | – | ६४ |



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

११९

मन धांवुनियां आलें तुजपाशी। सांगाया देवासी विनंती ही।।
नौबदी वरती वाजविली काठी। ब्रह्मनाद पोटी उमटला।।
प्रार्थियलें दान दिलें मजलागी। जिरवाया अंगी उणीव ती।।
दास लागे पायां देंई तें सामर्थ्य। दयाळ समर्थ अससी गा।।

१२०

भावें घेंई गुरुचें नाम।। भावें।।ध्रु.।।
ब्रह्माविष्णू महेश्वरानें। सांठविला हृदिं राम।।भावें.।।
रात्रंदिन गुरु आठव करितें। मन पावे आराम।।भावें.।।
अनन्यभावें शरण दासि ही। गाइ ध्याइ तव नाम।।भावें.।।

१२१

पंचमहाभूतें पोसिलें शरीर। व्यर्थ गुरगूर प्राणिया रे।।
एकला आलासी एकला बा जासी। प्रपंची गोंवसी भृंगापरी।।
अधर्मे चालाया न वाटे हीनता। आपुली ती सत्ता चालविसी।।
दास म्हणे ठेवा मत्ता एकीकडे। पाहीं चहूंकडे घडामोड।।

# सद्विचार

यथा प्रल्हादनात् चंद्रः
प्रतापात् तपनो यथा।
तथैव सोऽभूदन्वर्थो
राजा प्रकृतिरंजनात् ।।१२।।

—रघुवंश, सर्ग ४.

"आनंद देणे या गुणामुळें 'चंद्र' हा शब्द सार्थ झाला; अति ताप देणे या गुणामुळें 'तपन' हा शब्द सार्थ झाला; प्रजेचे कल्याण या सद्गुणामुळें 'राजा' शब्द रघूराजाच्या बाबतीत अर्थपूर्ण झाला."

—कविकुलगुरु कालिदास-रघुवंश, सर्ग ४.

संपादकीय



# मंगलाचरण



आपण मंगलाचरणाच्या परंपरेचा शोध घ्यायला सुरुवात केलेली आहे. [लौ]किक म्हणून जन्माष्टमीचा विचार केला. अर्थात आपल्या विचारशृंखलेत खण्ड [प]डलाच. मंगलाचरण हे अडचणी येऊ नयेत, कार्य निर्विघ्नपणे शेवटास जावे म्हणून [म्हण]ायचे तर येथे आपल्या मंगलाचरणातच खण्ड पडला हा काय प्रकार आहे असे [कोण]ाणास वाटेलही. पण आम्ही सुरुवातीला म्हटले होते की वेळ, प्रसंग सांगून येत [ना]हीं व आल्यावर त्याला सामोरे जावे लागते. प्रसंग निभावून न्यायचा असतो. तेथे [मा]घार नाही व सोडून द्यायचे नाही तर यशस्वी शेवट गाठायचा याकरितां हे [मंग]लाचरणाचे माहात्म्य आहे. आपण एखादे काम करीत असता पाहुणा येतो. तेव्हां [का]म बाजूला सारून त्यांच्याशी बोलून परत आपणास आपल्या मूळ कार्याकडे [व]ळावयाचे आहे, याचे भान विसरलो तर कार्य पुरे कसे होणार ? हे अनुसंधान शेवटपर्यंत [र]हावे म्हणून श्रीगणेशासह सर्व देवांची प्रार्थना आहे. कामात खण्डही अनेक कारणांनी [प]डू शकतो. वीज गेली, गॅस संपला, पेन्सिलीचे टोक मोडले, प्रकृती बिघडली अशी [ए]क ना दोन, अनेक कारणे निर्माण होऊन कामात व्यत्यय येतो पण म्हणून कामच [सो]डून देणे हे शहाणपणाचे लक्षण नाही. वीज ही गोष्ट आमच्या स्वाधीनची नाही. [त्य]ाकरितां आम्ही अनेकांवर विसंबून आहोत. तेव्हां या असल्या परस्वाधीन गोष्टींवर [आ]मचे कार्य अवलंबून असल्याने तात्पुरता खंड पडला तरी कार्याचे भान ठेवून तिकडे [पर]त वळण्याची प्रवृत्ति व्हायला पाहिजे म्हणून आधींच आम्ही संपूर्णता यावी म्हणून [प्रा]र्थना करून ठेवतो. ही मानसिक तयारी करण्याचे साधन म्हणून मंगलाचरणाचा [प्रघ]ात आहे.

आपण ऋग्वेदाचे मंगलाचरण पाहिले व त्यानिमित्ताने ऋग्वेदाची थोडीशी [ओ]ळख करून घेतली. थोडीशी म्हणण्याचे कारण ऋग्वेद हा मोठा ग्रंथ असल्याने [त्या]ची यथार्थ ओळख करून द्यायला बराच अवधी द्यायला पाहिजे. आपला हेतू [मं]गलाचरण कोणी व कसें केले हे परंपरेतून समजून घेण्याचा आहे तेव्हां त्या विषयाची [ओ]ळख होण्यापुरता त्या त्या ग्रंथांचा परिचय करून घेऊ.

## - वेद -

वेद म्हटले की आपल्या दृष्टीसमोर प्रचंड वाङ्मय उभे राहाते. ऋग्वेद हा या वेदवाङ्मयांतील आदि ग्रंथ. मुख्य वेद चार असल्याचे सर्वश्रुत आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हे ते चार प्रमुख वेद आहेत. धनुर्वेद, आयुर्वेद, गांधर्ववेद असे वेदांचे उपवेद गणले जातात. परंतु वेद म्हटल्यावर केवळ ऋग्वेद वा चारी वेद, उपवेद एवढाच अर्थ अभिप्रेत नाहीं तर याव्यतिरिक्त असलेले म्हणजे वेदांगे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, उपनिषदे, प्रातिशाख्यादि अनुषंगिक ग्रंथ, या सगळ्यांना मिळून 'वेद' असे म्हटले जाते. 'वेद' या शब्दात या प्रचंड ग्रंथसमुदायाचा समावेश होतो. ऋग्वेदापासून आपण मंगलाचरण परंपरा शोधण्यास आरंभ केलेला आहे. या ऋग्वेदाच्या दोन शाखा आहेत. तशा अनेक म्हणजे २१ शाखा असल्याचा उल्लेख आहे. तथापि आज मात्र केवळ 'शाकल' नावाची शाखा संपूर्ण स्वरूपात उपलब्ध आहे. ऋग्वेदानंतर आपण आता दुसऱ्या म्हणजे 'यजुर्वेदाकडे' वळूया.

## - यजुर्वेद -

सर्वसाधारणपणे वेदांचा काळ ५ हजार वर्षांच्या पलिकडील मानला जातो. आर्यांनी समृद्ध केलेली भूमि इतरांना आकर्षित करीत होती. ते येथे येऊ लागले. त्यांनी आर्यांकडे आपल्यात सामावून घेण्याची इच्छा प्रदर्शित केली तेव्हां येणाऱ्यांचे स्वागत व पुनर्वसन हा मोठा प्रश्न होता. हिमालय व त्याचा परिसर हा आर्यांनी भरभराटीला आणलेला सरस्वतीच्या काठावरील मुलुख. त्यांत नवीन येणारे वाढल्याने त्यांच्याकरिता जागा तयार करणे म्हणजे जंगले साफ करावयास हवीत. तेव्हा गंगा-यमुनांच्या मुलुखातील घनदाट अरण्यांत वसती पसरण्याकरितां जागा मोकळी करायला सुरुवात झाली. या प्रक्रियेतून यज्ञसंस्थेचा विस्तार झाला. यज्ञसंस्थेला एका सामाजिक संस्थेचे स्वरूप प्राप्त झाले. समाजातील सर्व थरांतील लोक यज्ञात सामील असत. प्रत्येकाला आपापली कामे वाटून दिली जात. सर्वांनी आपली जबाबदारी, योग्यता ओळखून यात सहभागी व्हावयाचे हा सामाजिक उद्देश यज्ञसंस्थेच्या मुळाशी होता. जंगलातील हिंस्र व अन्य प्राणी संपूर्णपणें नष्ट करण्याऐवजीं त्यांचे अग्नीला हवन करावयाचे. पाऊस पडून निर्माण होणारे धान्य प्रथम अग्नीला व त्या त्या देवतांना अर्पण करून मग आपण घ्यायचे. ज्याने दिले त्याची आठवण ठेवणे या कृतज्ञतेपोटी हवन केले जात असे. या यज्ञसंस्थेचा आत्मा म्हणजेच यजुर्वेद होय.

(क्रमशः)

**- डॉ. वि. वा. सातपूरकर**
कार्यकारी संपादक

# - निमंत्रण -

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी

साईभक्तांनो,

श्री साईबाबा संस्थान, शिरडी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे वर्षी दिनांक २८ सप्टेंबर १९९० ते १ ऑक्टोबर १९९० या कालावधीत ''श्री पुण्यतिथी उत्सव'' शिरडी येथे साजरा केला जाणार आहे.

तरी आपण यात सहभागी होऊन ह्या सोहळ्याची शोभा वाढवावी.

श्री साईबाबांच्या शुभाशीर्वादांसह

आपले स्नेहांकित

पं. क्षीरसागर
कार्यकारी अधिकारी

डॉ. लेखा पाठक
अध्यक्षा

यादृशं कुरुते कर्म तादृशं फलमश्नुते।।

- रामायण ७/१५/२४

ज्या प्रकारचें कर्म मनुष्य करितो, त्याच प्रकारचें फळ त्याला मिळतें.

# श्री पुण्यतिथी (दसरा) उत्सव १९९०

श्री क्षेत्र शिरडी येथे दिनांक २८/९/९० ते १/१०/९० असे चार दिवस श्री पुण्यतिथी (दसरा) उत्सव साजरा करण्यात येणार असून, उत्सवात श्री साईसत्चरिताचे अखंड पारायण, पोथी, फोटो, वीणा मिरवणूक, सुशोभित रथ व पालखीची मिरवणूक, भिक्षा झोळी कार्यक्रम, निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. उत्सवात सुशोभित मंडप व कमानी उभारण्यात येणार आहेत. भक्तांच्या निवासाची, प्रसाद-भोजन, चहा इत्यादीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच उत्सवात भक्तांसाठी मदत केंद्र उघडण्यात येत आहे. भक्तांना येण्या-जाण्यासाठी जादा एस.टी. बसेस सोडण्याबाबत एस.टी. महामंडळास व रेल्वेस जादा डबे जोडण्याबाबत रेल्वे खात्यास विनंती करण्यात येत आहे.

दिनांक २८/९/९० रोजी श्री साईसत्चरिताच्या अखंड पारायणात ज्यांना भाग घ्यावयाचा असेल त्यांनी दिनांक २७/९/९० रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आपली नावे मंदिर कार्यालयात नोंदवावी. त्याच दिवशी सायंकाळी ७.३० वाजता चिठ्ठ्या काढून पारायणासाठी भक्तांची निवड करण्यात येईल. दिनांक २९/९/९० रोजी मुख्य दिवशीच्या रात्री श्रींच्या समोर हजेरी लावण्यासाठी कलाकारांनी आपली नावे त्याच दिवशी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत मंदिर कार्यालयात नोंदवावीत.

- कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

---

## कार्यक्रम

- प्रथम दिन -

शुक्रवार, दिनांक २८ सप्टेंबर १९९०

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ५-१५ | श्रींची काकड आरती |
| ,, | ६-० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक |
| ,, | ६-३० | द्वारकामाईत श्री साईसत्चरिताचे अखण्ड पारायण |
| ,, | ६-३० | श्रींचे मंगलस्नान व दर्शन |

| | | |
|---|---|---|
| ारी | १२-३० | माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद |
| " | ४ ते ६ | कीर्तन |
| ध्याकाळी | ६-०० | धूपारती |
| ध्याकाळी | ७-३० ते ९-०० | आमंत्रित कलाकारांच्या गायनाचा कार्यक्रम |
| त्री | ९-१५ | श्रींच्या पालखीची मिरवणूक |
| " | ११-०० | शेजारती |

## - श्री पुण्यतिथी दिन -

शनिवार, दिनांक २९ सप्टेंबर १९९०


| | | |
|---|---|---|
| ाटे | ५-१५ | श्रींची काकड आरती |
| ाळी | ६-०० | अखण्ड पारायण समाप्ति |
| " | ६-३० | श्रींचे मंगलस्नान व दर्शन |
| " | ९-०० | भिक्षा झोळी कार्यक्रम |
| " | १०-३० ते १२-३० | पुण्यतिथी कीर्तन |
| ारी | १२-३० | माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद |
| " | १-०० | आराधना विधि |
| याकाळी | ५-०० | सीमोल्लंघन व मिरवणूक कार्यक्रम |
| " | ६-०० | धूपारती |
| त्री | ९-१५ | श्रींच्या रथाची मिरवणूक |
| " | ११-०० ते | कलाकारांची हजेरी |
| ाळी | ६-०० | |

(मंदिर दर्शनासाठीं रात्रभर उघडे राहील)

## - तृतीय दिन -

रविवार, दिनांक ३० सप्टेंबर १९९०

| | | |
|---|---|---|
| ाळी | ६-०० | श्रींचे मंगलस्नान व दर्शन |



| | | |
|---|---|---|
| ,, | ७-३० | रुद्राभिषेक (गुरुस्थान मंदिरात) |
| दुपारी | १२-३० | माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद |
| संध्याकाळी | ६-०० | धूपारती |
| ,, | ७-३० ते ९-४५ | कीर्तन |
| रात्री | | |
| ,, | १०-०० | शेजारती<br>निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम |

## - उत्सव सांगता -

सोमवार, दिनांक १ ऑक्टोबर १९९०

| | | |
|---|---|---|
| पहाटे | ५-१५ | काकड आरती |
| सकाळी | ६-३० | श्रींचे मंगलस्नान व दर्शन |
| ,, | १०-३० | गोपालकाला कीर्तन व दहीहंडी |
| दुपारी | १२-३० | माध्यान्ह आरती व तीर्थप्रसाद |
| संध्याकाळी | ६-०० | धूपारती |
| ,, | ७-०० ते ९-०० | गायनाचा कार्यक्रम |
| रात्री | १०-०० | शेजारती<br>निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम |

टीप– १) उत्सव काळात सत्यनारायण पूजा होणार नाहीत.
२) सोईप्रमाणे कार्यक्रमात बदल करण्यात येईल.

# श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिर्डी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानाला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

. गेली कांही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिर्डीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखों भाविकांना शिर्डीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून संस्थानने सुखसोईमध्ये वाढ करण्याचे ठरविले आहे.

"साईबाबा भक्त निवास" अशी ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलले आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येतील. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय केली जाईल. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, अशा सभागृहाची योजना असून या दोन्ही सोयींमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असलेले एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत असेल.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन मंदिराच्या परिसराच्या नूतनीकरणाची योजना त्यानंतर हाती घेतली जाणार आहे. या नूतनीकरणामुळें श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

शिर्डी संस्थानच्या वतीने सध्याच्या १०० खाटांच्या इस्पितळाचा विस्तार, वैद्यकीय महाविद्यालय अशा आणखी योजना हाती घेण्यात येणार आहेत. इंग्रजी माध्यमाची शाळा नुकतीच सुरु झालेली आहे. ८० खोल्या असलेल्या इमारतीचा उद्घाटन समारंभ लवकरच करण्यात येणार आहे.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थानने वरील नमूद केलेले महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता देणगी दिल्याने होणार आहे.

शिर्डी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणास या कार्याकरिता उदारहस्ते

मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

आपल्या देणग्या खालील पत्यावर पाठवाव्यात :—

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी
मु. पो. शिर्डी, तालुका: कोपरगांव
जिल्हा: अहमदनगर.

सूचना: चेक "श्री साईबाबा संस्थान, शिर्डी" या नावाने पाठवावेत.

धर्मो हि परमो लोके धर्मे सत्यं प्रतिष्ठितम् ।।

- रामायण २/२१/४१

लोकांमध्ये धर्म हा अत्यंत श्रेष्ठ आहे, आणि धर्माच्याच ठिकाणीं सत्य प्रतिष्ठित आहे.

उत्सवादपि नीचानां कलहोऽपि सुखायते ।।

- योगवासिष्ठ ३/७०/७६

नीचवृत्तीच्या लोकांना आनंदोत्सवापेक्षांही कलहच अधिक प्रिय असतो.

# श्री गणेशास अग्रपूजेचा मान

- वैद्यराज भाऊसाहेब कुळकर्णी,
मुंबई.

**ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।**
**जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।**
**देवा तूंचि गणेशु। सकलार्थ मती प्रकाशू।**

संत शिरोमणी श्री ज्ञानेश्वर महाराज आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथात प्रथम ओवीत त्यांनाच वंदन करीत आहेत. शब्द ब्रह्माचें जें मूळ स्वरूप ओंकार यालाच त्यांनी श्री गणेश देवता संबोधून वंदन केलेले आहे.

भगवंताचें नामाचा महिमा स्वत: भगवंतापेक्षाही श्रेष्ठ असल्याबद्दल पुष्कळ कथा आहेत. गोस्वामी तुळसीदास महाराज लिहितात–

**कहौ कहां लगि नाम बढाई। रामु न सकहिं नाम गुन गाई।।**

भगवान श्रीरामसुद्धा आपल्या नामाचा महिमा पूर्ण तऱ्हेनें वर्णन करू शकत नाहीत. लंकेला सैन्य नेण्याकरतां सेतु बांधण्याचें काम वानरसेनेकडून सुरु होते. मोठ-मोठ्या शिळा घेऊन त्यावर रामनाम लिहून त्या समुद्रात सोडीत वानरसेना पूल तयार करीत होती. त्या प्रसंगी श्री भगवान रामचंद्र यांनी एक शिळा समुद्रात टाकल्यावर ती बुडाली हें त्याचे परमभक्त हनुमंतांनीं पाहिल्यावर प्रभूनें हनुमंतांना विचारले, "माझी शिळा कां बुडाली?" त्यावर श्री हनुमंतांनी उत्तर दिले, "महाराज, आपण ज्याला सोडलें तो कसा तरणार?" आम्ही आपलें नाव लिहून नंतर समुद्रात शिळा सोडतो म्हणून त्या तरतात. या पौराणिक कथेतला विनोदाचा भाव सोडला, तरी त्यांत प्रभुनामाचें महत्त्व दिग्दर्शित करण्याचा हेतु दिसतों.

बऱ्याच मोठ्या संख्येने अशा व्यक्ति आहेत कीं, ज्या भगवन्नामाचा जप करीत असलेल्या दिसतात, पण त्या व्यक्तिंमध्यें भगवन्नामाच्या माहात्म्याचें ज्ञान नसल्याने त्या व्यक्तीमध्यें भगवन्नामाचा कांहीही परिणाम झालेला दिसून येत नाहीं. असें कां होतें याबद्दल श्री तुलसीदासजी स्पष्टीकरण करतात–श्री तुलसीदास महाराज यांनी नाम-रामायण म्हणून एक सूत्र लिहिलें आहें. तें म्हणतात कीं, "जर आम्ही भगवन्नामाचा जप यथाविधी करीत असलो तर त्याचा परिणाम जपकर्त्यावर झालाच पाहिजे हा नाम-रामायण सूत्राचा मतितार्थ आहे."

जर आमच्या जीवनात बुद्धिरूपी अहिल्या पत्थर झालेली असेल, आणि

दुराशारूप त्राटिका विद्यमान असेल व मोहरूप रावण अंतःकरणात जिवंत असेल तर आमच्या जीवनात प्रभुनामाचें माहात्म्य कळाले नाही हेंच सिद्ध होते. दुराशा, मोह इत्यादि हें प्रतिबंध असल्याने नामाचे माहात्म्य कळत नाही; म्हणून अनुभव येत नाही.

भगवंत तर जगांत अवतार घेण्याचे पूर्वीही असतातच. ते तर प्रत्येक काळी, प्रत्येक देशांत व प्रत्येक व्यक्तीचें हृदयांत नेहमी असतातच. परंतु जोपर्यंत भगवान राम यांना प्रकट केले गेले नाही, तोपर्यंत संसाराच्या समस्येचे समाधान होत नाहीं. लाकडातला अग्नी प्रगट केल्यावरच त्या लाकडाला जाळून भस्म करतो तसे रामनामाचें बोधरूप प्रगटीकरण अज्ञानाचा नाश करीत असते. तुकाराम महाराज म्हणतात – **निर्गुणी ते माझे नाही समाधान। मी भक्त तूं देव ऐसे करी।।** एकत्वात भोग नसतो. त्याकरतां द्वैताची आवश्यकता असते. भक्तीमध्ये परमेश्वरी ज्ञानाचा भोग मिळतो. भोग द्वैतातच अनुभवाला येतो. जशी झोप लागली तर झोपेंत झोपेचा आनंद वाटत नाहीं. झोंप संपून जागे झाल्यावर 'मला स्वस्थ झोंप लागली होती' हा आनंद झोपेंच्या तद्रूप अवस्थेत नसतो. तसें ब्रह्माशी तद्रूपस्थितीत ब्रह्माची स्थिती आहे पण त्या स्थितीचा भोग नाहीं. भोग हा जागे झाल्यावरच्या स्मृतीत असतो. स्थिती आणि स्मृती यातला हा सूक्ष्म फरक लक्षांत येणें आवश्यक असते. झोपेतच स्मृती नसते तर ती ब्रह्मस्थितीच्या म्हणजे झोपेच्या त्यावरच्या अवस्थेंत कशी असणार?

भगवंताचें नामाचें रामायण हृदयांत प्रगट होणें अवश्य असते. म्हणजे '**ज्याचे नाव घेशी तेंचि तूं आहेसि।**' हा बोध असणे अवश्य आहे. श्री तुलसीदास महाराजांना कोणीतरी विचारले कीं, आपण रामनामाचा इतका प्रचार व महात्म सांगता पण आम्हाला नामाच्या महिम्याचा अनुभव कां येत नाही? त्यावर गोस्वामी एक दृष्टांत देऊन समजावितात कीं, एका मनुष्यास रस्त्यांत खरें रत्न सापडते पण त्या रत्नाची ओळख त्याला नसल्याने तो त्या रत्नाला काचेचा तुकडा समँजतो. पण त्या मनुष्यास रत्नाची ओळख न झाली म्हणून रत्नाची किंमत कमी होत नसते. इतके मात्र खरें की रत्न सापडल्यावर व हे रत्न आहे असा बोध (ज्ञान) नसल्यामुळे त्याचे अंतःकरणांत रत्न सापडल्याचे समाधान मिळत नाहीं. योग्य परीक्षकाला दाखविल्यानंतर रत्न आहे असें कळतें व त्यामुळे त्याला समाधान मिळते. म्हणजे सद्गुरुशिवाय नाम माहात्म्य कळत नसते. त्यांनीच त्याचे माहात्म्य समजावून द्यावे लागते.

**रामनाम सब कहे। ठग ठाकूर और चोर।।**
**जिस नामसे ध्रुवप्रल्हाद तरे। वो नाम कुछ और।।**

'रामनामा'ला फक्त हा दोन अक्षरांचा समुदाय म्हणून न पाहणें व्यक्तीच्या

अंतःकरणात सद्गुरूंनी नामाच्या महिम्याचे ज्ञान पटवून द्यावे लागते. तरच रामनामाच्या तत्वाचा बोध होतो.

रत्न म्हणून बोध झाला तरी त्याचा उपयोग फारसा नसतो. रत्न जवळ असले म्हणजे भूक, तहान मिटली जात नाही, थंडी वाजते ती संपत नाहीं, आपले दारिद्र्य नाहीसे होत नाही. याचा अर्थ असाच होतो की, व्यक्तिची भूक, तहान, थंडी, उष्णता न जवळ असूनही दूर होत नाही. रत्नाचा रत्न म्हणून बोध होऊनही भागत नाही : आम्ही त्या रत्नाची विक्री करून, त्या मूल्यात आम्ही सर्व जरूरीच्या वस्तु मिळवू शकतो. त्याकरतां भाजी विकणाराकडे जाऊन उपयोग नसतो. त्याला रत्नाचा खरा पारखीच योग्य किंमत देऊ शकेल. तसें, श्री गोस्वामी सांगतात – आम्हाला प्रथम 'रामनाम' रत्नाची महिमा सद्गुरुकडून समजाऊन घेतली पाहिजे व नंतरच जोहरी आपणास योग्य मूल्य देईल म्हणजे नामाचे यथार्थ माहात्म्य आम्हाला विदित होईल.

मंत्र ग्रहण करण्याची जी प्राचीन परंपरा होती त्याचा हेतु हाच होता कीं, सद्गुरुकडून त्या मंत्राचे माहात्म्य कळेल व योग्य फळ मिळेल. याकरतां श्री गोस्वामीजी नाम महिमा सांगत आहेत –

**नाम प्रभाऊ जान गनराऊ। प्रथम पूजियत नाम प्रभाऊ।।**

श्री गणेशजी नाम महिमा संतकृपेने जाणून घेऊन सर्व देवतामध्यें अग्रपूजेचा मान मिळविते झाले, ती कथा अशी आहे – पुराणामध्ये श्री गणेश चरित्र वर्णन सांकेतिक आहे. खरें म्हणजे श्री गणेश ही बुद्धीची देवता आहे. सर्व शास्त्रांचें यथार्थ ज्ञान त्यांना आहे. देवतांचे मनांत स्वत:ला मोठे समजण्याची प्रवृत्ति असते असें शास्त्रवर्णन आहे. त्या वेळी प्रश्न असा उत्पन्न झाला कीं, सर्वप्रथम कोणाची पूजा करावी. श्री भगवान शंकर यांनीं निर्णय दिला कीं ब्रह्मांडाची प्रदक्षिणा करून जो प्रथम येईल, त्यालाच अग्रपूजेचा मान द्यावा. देवता ह्या सद्गुणांचे प्रतिक आहेत, त्यांतही सर्वश्रेष्ठ पुण्य कोणते हा प्रश्न येतो. म्हणजे सर्वात मोठा सद्गुण कोणता आहे की ज्यामुळे जीवनाला महत्त्व प्राप्त होते, अशाच व्यक्तीची पूजा जीवनांत प्रथम होत असते.

पितामह ब्रह्मदेवांचा आदेश ऐकून प्रत्येक देवता आपापल्या वाहनावर बसून ब्रह्मांड प्रदक्षिणेला निघाले. इतर सर्व देवतांची वाहने तीव्र गतीची होती आणि श्री गणेश यांचे वाहन उंदीर सर्वात लहान, कमजोर, चालण्यांत इतर देवांच्या वाहनाचे तुलनेने अगदीच मंद व शरीराने ही अगदीच लहान असा असल्यानें इतर सर्व देवतांनी सहज कल्पना केली कीं, श्री गणेशजी या ब्रह्मांड प्रदक्षिणेच्या कार्यक्रमांत भाग घेणें शक्य नाहीं.

श्री गणेश ही विवेकाची देवता – लहान म्हणजे किरकोळ वाहन, त्याच्या मदतीनें ब्रह्मांड प्रदक्षिणा शक्य नाहीं हाच विचार श्री गणेश करतील. शिवाय त्यांचे शरीर अवाढव्य, म्हणूनच त्यांना लंबोदर नांव पडले.

ह्या विशाल उदरांत ज्ञान साठविण्याचे सामर्थ्य आहे व ते पचविण्याची म्हणजे योग्य विल्हेवाट लावण्याची शक्ती आहे हे सामान्य देवतांना कसे कळणार!

श्री गणेशजी आपल्या वाहनावर आरूढ होऊन ब्रह्मांड प्रदक्षिणेत भाग घेत आहेत हे पाहिल्यावर सर्व देवांना आश्चर्य वाटले. त्यांच्या सर्वांच्या मनांत विचार उत्पन्न झाला कीं, श्री गणेशजी बुद्धीची देवता म्हणतात पण या परिक्रमेच्या प्रसंगात त्यांनी कांहींच विचार केलेला दिसत नाहीं. ब्रह्मांड किती विशाल, आपले अवजड शरीर शिवाय वाहन किरकोळ त्याची गती काय? अशा परिस्थितीत प्रदक्षिणेला किती वेळ लागेल हा विचार केलेला दिसत नाहीं. सर्व देव आश्चर्यानें पाहू लागले की श्री गणेशजींनी मूषकारूढ होऊन शांत चित्तानें ब्रह्मांड परिक्रमेला आरंभही केला आहे.

योगायोग असा कीं, ज्या दिशेनें सर्व देवता प्रदक्षणेला जात होते, त्यांचे समोरूनच श्री देवर्षि नारदजी प्रदक्षिणेचा सोहळा पाहण्यास उलट दिशेने येत होते. नारदजींना लांबून सर्व देवांनी पाहिले, त्यावेळीं मनात सर्व देव घाबरले. त्यांना वाटले नारदजी आपणास उगाच विलंब करतील. एखादे भजन म्हणून म्हणा कीं, इतर गोष्टी सांगून, आणि असे झाले तर आपल्या प्रदक्षिणेत गोंधळ होईल, म्हणून प्रत्येक देवता मोठ्या चातुर्यानें नारदजींकडे न पाहता तोंड लपवून आपला मार्ग आक्रमू लागले. जणू आपण त्यांना पाहिलेच नाही हा भाव मनांत धरून. कारण नारदांना पाहूनही जर त्यांना देवांनी नमस्कार न केला तर नारदजी रागावून शापही देतील, आणि प्रदक्षिणेला विलंब होईल तो निराळाच म्हणून तोंड लपवून सर्व देवांनी आपला मार्ग चालू ठेवला. सर्वज्ञ श्री नारदजी फार विनोदी होते हें सर्वश्रुतच आहे; त्यांना देवतांची ही वृत्ति पाहून मोठे हसू आले व आश्चर्यही वाटले.

सर्व देवांचे मागावून श्री गणेशजी आपल्या वाहनावर बसून हळुहळु मार्ग क्रमण करीत होते. त्यांनी समोरून येणाऱ्या नारदजींना पाहून प्रवास थांबवला व आपल्या वाहनावरून उतरून श्री महर्षींना नमस्कार केला व हात जोडून उभे राहिले. हें पाहून नारदजी प्रसन्न झाले व हास्य वदनानें श्री गणेशजींना विचारले कीं, "इतर सर्व देवता आपापल्या वाहनावर बसून वेगानें ब्रह्मांड परिक्रमा करीत आहेत, माझ्याकडे त्यांनी पाहिले सुद्धा नाहीं, याबद्दल मला आश्चर्य वाटले नाहीं पण आपण बुद्धीची देवता असून कोणत्या निर्णयावर अवलंबून या कार्यात सम्मिलीत झाला आहात."

संसारात दोन प्रकारचे लोक पहावयास मिळतात. एक वर्ग असा आहे की

तो कर्म करण्यात अधिक प्रवृत्ति असलेला व दुसरा वर्ग फक्त विचारातच गुंग असलेला. या दोन्ही प्रवृत्ति घातकच आहेत. कर्माच्या अतिरेकानें विचारांची अवहेलना होते व विचारांचे अतिरेकाने कर्माची अवहेलना होते. या दोन्ही गोष्टी अपूर्णच आहेत पण श्री गणेश देवतेत या दोन्ही वृत्तींचा समन्वय आहे.

श्री गणेशजी नारदास म्हणाले कीं, ''मी परिक्रमेत भाग न घेतला तर निष्क्रीयतेची प्रवृत्ति होईल. मी प्रथम यावे व ती मान्यता मला मिळावी असें मनांतही आणले नाही. ब्रह्मांड प्रदक्षिणा व्हावी, त्याचे दर्शन व्हावे हा माझा हेतु आहे. प्रदक्षिणेत संतांचे दर्शन व्हावे ह्या हेतूनेच मी प्रारंभ केला आहे. आणि त्या माझ्या हेतुप्रमाणें आपल्यासारख्या महर्षींचे दर्शनाचा योग आला व मला आनंद मिळाला, हेंच जीवनाचे सर्वोच्च फल मी समजतो. जर मी प्रदक्षिणा प्रारंभ न करतो तर आपल्या दर्शनास मुकलो असतो.

श्री गणेजींची ही विवेकदृष्टि पाहून नारदजींना फार आनंद झाला. त्यांनी श्री गणेशजींना सुचविले कीं, 'मी एक गोष्ट आपणास सांगतो, आपण ती मान्य कराल तरच सुचवितो.' त्यावर गणेशजी म्हणाले 'आपल्या आदेशाप्रमाणें मी जरूर वागेन.'

श्री नारदजींनी सांगितले कीं, पृथ्वीवर 'रामनाम' लिहा व त्याची प्रदक्षिणा करा. असें केले तर ब्रह्मांड प्रदक्षिणेचे पुण्य लाभते. श्री गणेशजींनी या सांगण्यावर निष्ठा ठेवली. कोणतीही शंका न घेता आज्ञेप्रमाणें केले. याचा अभिप्राय असा आहे की, 'ग्रंथ वाचून किंवा श्रवण करून आम्ही जे ऐकतो, त्यावर आमचे अंत:करणांत संशय उत्पन्न होतो व आम्ही त्या आज्ञेचे पालन करीत नाही. याकरतां या अध्यात्म मार्गात संतवचनावर विश्वास पाहिजे असतो. तुकाराम महाराज म्हणतात—तुका म्हणे **माझा संतावरी विश्वास। तोचि माझे हित करितां सकळ।**

श्री नारदजी हें परमेश्वराचे अनन्य भक्त असून प्रभुनामाचा प्रचार करीत फिरत असत. त्यांना योग्य अधिकारी श्री गणेजी मिळाले. जे त्यांचा उपदेश समजू शकतील तेच त्या प्रमाणें आचरण करू शकतील. उपदेश समजणें हें ज्ञान आहे व आचरणांत तो आणणे हा विश्वास आहे. जीवनात ही दोन्ही हवी असतात.

श्री नारद महर्षींचा उपदेश ऐकून गणेजींना फार समाधान वाटलें. श्री मानवस्वरूप शंकराचे पुत्र, विवेकाचे दैवत, तसेंच विश्वासाचेही पुत्रच असे गणेशजी होते. आणि त्यांना प्रेरणा देणारे सद्गुरु श्री महर्षि नारद मिळाले होते. हा त्रिवेणी संगम गणेशदेवतेला लाभला. सद्गुरु त्यांनाच म्हटले जाते कीं, जे आमच्या अंतर्मनात श्री भगवंताचे नामाचे महात्म्यावर दृढ निष्ठा उत्पन्न करून देतात. श्री गणेशजींनी विवेक दृष्टीने नामाचा महिमा जाणून संतकृपेचा लाभ करून घेतला. 'रामनाम' ही साधारण दोन अक्षरे आहेत,

शब्द आहेत असा संशय घेतला नाही. मोठ्या निष्ठेने संत वचनावर विश्वास ठेवून आज्ञा पालन केले.

ब्रह्मांड निर्माण कसे झाले. त्याचे मूळस्वरूप काय, याबद्दल पुराणांतरी पुष्कळ उहापोह केला आहे. आधुनिक विज्ञानही त्याबाबत पुष्कळ प्रयत्न करीत आहे, पण मानवी बुद्धीला त्याबद्दल पूर्ण कल्पना आलेली नाही. पौर्वात्य संतांनी त्याबद्दल शेवटी एकच निर्णय घेतला — **न कळे कोणाला। हेचि त्याचे वर्म।।** मानवी बुद्धीच्या शक्ती बाहेरचे ते तत्व आहे. या सिद्धांतावर येऊन स्तब्ध झाले. त्यातल्या त्यात पौर्वात्य ऋषींनी कांहीं नियम शोधून काढले.

शब्दगुणकं आकाशं। आकाशाचा शब्द गूण. आकाश म्हणजे शून्य. म्हणजे कांहीं नसणें. कांहीं नसणें याला आधार आत्मन् म्हणजे परमेश्वरी मूळ तत्वाचा. शब्दगुणाची म्हणजे 'रामनाम' प्रदक्षिणा म्हणजे तत्वत: ब्रह्मांड प्रदक्षिणा होय. या कथेच्या रूपकात्मक अर्थाचे स्पष्टिकरण करून हा लांबलेला लेख पूर्ण करू.

ब्रह्मांड प्रदक्षिणा पूर्ण करून आत्मबोध होत नाहीं, कारण तो कर्म मार्ग आहे. कर्माने चित्त शुद्धि होते. **चित्तस्यशुद्धये कर्म। न च वस्तु उपलब्धये। चित्तशुद्धि विचारेण। न किंचित् कर्मकोटिभि:।** सत्गुरुंच्या उपदेशाप्रमाणें आत्मस्वरूपाच्या वस्तुस्थितीचा बोध बुद्धीत निश्चित करणें हा हेतु आहे. आत्मतत्वाचा बोध हीच ब्रह्मांड प्रदक्षिणा होय. मंदिराला आपण प्रदक्षिणा घालतो म्हणजे मंदिराला आपण आपणात समाविष्ट करून घेतो, तसें संतवचनावर निष्ठा ठेवून आपण सर्वत्र नित्य असलेल्या आत्मतत्वाचे स्वरूपाचा बुद्धीने निश्चय करून, हें दिसणारे व भासणारे जगत हा क्षणिक पसारा भ्रमरूप आहे हें पटवून घेऊन नंतर तो विचार पचविणें म्हणजे त्या दृष्टीने जगाकडे पाहणें, हा या कथेचा सारांश आहे. श्री गणपती अथर्वशीर्षात या देवतेचे स्पष्ट वर्णन केले आहे; **''त्वंसाक्षात् आत्मासि नित्यं।''** आपणा सर्वांचे आत्मस्वरूप एकच आहे. उपाधि भिन्न असली तरी सर्वात तेंच एक सत्य तत्व आहे हा निश्चय संताकडून करून घ्यावा लागतो. पुराणांचा उद्देश — ज्यांना श्रुतिस्मृतीचा अर्थ कळत नाही त्या सामान्य जनांकरता पुराणकारांनी गोष्टीरूपानें सोदाहरण, आत्मतत्वाचा निश्चय व्हावा म्हणून अनेक कथातून आत्मज्ञानाचे दृढीकरण व्हावे म्हणून प्रयत्न केलेला आहे.

**आत्मबुद्धि निश्चयांची। हेंचि स्थिती मोक्षश्रीची।**
**अहं आत्मा हें कधीचि। विसरू नये।**

आपण ज्ञानरूप आहोत. म्हणजे ज्ञान हाच आत्मा आहे हा निश्चय होणें. ज्ञान तोचि नारायण। ज्ञान तोचि नारायण। असें संत वचन आहे. हाच तो श्री

ज्ञानेश्वर-माऊलीनी आपल्या ग्रंथारंभी वर्णन केलेला श्री गणेश होय. ॐ **नमोजि आद्या वेद प्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या आत्मरूपा। देवा तूंचि गणेशु सकलार्थ मती प्रकाशु।**

जो मनरूपी चंचल वाहनाला आपल्या ताब्यांत ठेवतो. तो श्री गणेश हाच आत्मा होय.

जीवमात्रानें आपले स्वसंवेद्य, व्यापक, अनंत स्वरूपाचा संताचे कृपेने बोध करून घेऊन जगतात पूजनीय व्हावे हा पुराणकारांचा उपदेश आहे. हेंच तत्व या श्री गणरायाचे प्रथम पूजनाचे कथेंत दिग्दर्शित केले आहे. अशा श्री गणेशाला नमन करून हा लेख पूर्ण करूं.

**गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा।**
**मूळारंभ आरंभ तो निर्गुणाचा।**
**नमू शारदा मूळ चत्वारिवाचा।**
**नमू पंथ अनंत या राघवाचा।।**

हेंच तें श्री तुळशीदास महाराजांचे "नाम" रामायण होय.

---

## जाहिराती


अनेक भक्तांची "श्री साईलीला"त जाहिरातरुपाने बाबांची सेवा करावी अशी इच्छा आहे. त्यानुसार विश्वस्त मंडळाने "श्री साईलीला"त जाहिराती प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. या जाहिरातींचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| मलपृष्ठ | — | रु. १०,०००.०० |
| आतील मलपृष्ठ | — | रु. ७,५००.०० |
| आतील संपूर्ण पान | — | रु. ५,०००.०० |

सभासद, भक्त व हितचिंतक यांनी आपल्या जाहिराती आमच्या मुंबई कार्यालयाकडे पाठवून आम्हाला सहकार्य द्यावे.

- कार्यकारी संपादक

---



# श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय ८ वा

**सटीक गद्य अनुवाद:**
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त),
बंड गार्डन रोड, पुणे.

**''नरजन्म-महिमानं, भिक्षान्नसेवनं, बायजाबाई-भक्तिवर्णनं तथा तात्याम्हाळसापति-मशूधीशयनं''**

(नरजन्माचा महिमा, बाबांचे भिक्षा मागून खाणे, बायजाबाईच्या भक्तीचे वर्णन आणि तात्या कोते पाटील व म्हालसापती यांचे बाबांबरोबर मशिदीत झोपणे.)

(टीप: मूळ पोथीत या अध्यायाचे शेवटी अध्यायाचा विषय म्हणून ''श्रीसाईसमर्थावतरणं'' असा दिलेला आहे. परंतु या अध्यायांत श्री साईबाबांच्या या जगात प्रगट होण्याबद्दल काहीच उल्लेख नाही. तो विषय पूर्वी ४ थ्या अध्यायात येऊन गेलेला आहे आणि त्या अध्यायाचे शेवटी तसा हेमाडपंतांनी दर्शविलेलाही आहे. येथे तो पुन्हः चुकीने दर्शविला गेला आहे. म्हणून मी आपल्या मते वरचा विषय लिहीला आहे.)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरु साईनाथांना नमस्कार असो.

मागील अध्यायात सांगितले गेले की साईबाबा कसे हिंदू होते की मुसलमान, शिरडीचे भाग्य किती थोर (गहन) की ते बाबांचे आपले राहण्याचे ठिकाण (निज+स्थान) झाले. आरंभी बाबा कसे (लहान) पोर होते व पुढे कसे वेडे फकीर झाले, मूळच्या खडबडीत व रेताळ जागेवर (उरवर स्थळावर) त्यांनी कशी सुंदर बाग उठविली व काही काळानंतर त्याच जागेवर पुढे कसा (साठ्यांचा) वाडा झाला. (तसेच) धोतीपोती, खंडयोग वगैरे बाबांच्या अप्रतिम (गाढा) आणि धाडशी (निधडा) (हट) योगाचेही वर्णन झाले. आपला देह झिजवून भक्तांची दुःखे (अपाय) बाबा कसे सहन करीत असत (हेही मी सांगतले). भक्तांचा वाली (कैवारी) साईराय. त्याचे किती म्हणून मी वर्णन करू? (ओ. १-४)

आता ऐका नरजन्माचा महिमा, साईबाबांच्या भिक्षा मागण्याच्या वर्तनक्रमाचे (भैक्ष्यवृत्तीचे) वर्णन, बायजाबाईची संतसेवा आणि बाबांची भोजन करण्याची आश्चर्यकारक तऱ्हा. (भोजन कौतुक) तसेच तात्या कोते पाटील, बाबा आणि

म्हाळसापती कसे तिथे मशिदीत झोपत असत आणि कसे बाबा रहात्याला खुशालचंद (मारवाड्याच्या) घरी जात असत (हेही ऐका). (ओ. ५-८)

दिवस रोज उजाडतो आणि मावळतो. वर्षानुवर्षे अशी निघून जातात (जाहली फस्त). अर्धा जन्म तर झोपेतच (निद्रिस्त+अवस्था) जातो आणि उरलेला स्वस्थपणे भोगताही येत नाही. लहानपणी खेळण्याकडे लक्ष (क्रिडा+आसक्त), तरुणपणी तरुण स्त्रीवर अनुरक्त किंवा आसक्त (तरुणी+रक्त) आणि म्हातारपणी अशक्तपणामुळे आणि रोगांनी सदा त्रासलेला (असा मनुष्याचा जन्म असतो). जन्माला येऊन पुष्ट (लठ्ठ) होणे, श्वासोश्वास घेत राहणे आणि खूप वर्षे जगणे (दीर्घायुष्यवरि वांचणे) हे काय या जन्माचे सार्थक (केणे) म्हणावयाचे? परमाम्याची प्राप्ती करून घेणे हीच नरजन्माची खरी इतिकर्तव्यता (आयुष्यातील श्रेष्ठतम कामगिरी) होय. नाहीतर कुत्रे, डुकर वगैरेंच्या (श्वान सूकरादिकांच्या) पोट भरण्याच्या आयुष्यात कोणता अवगुण (उणे) आहे? कुत्रेही आपली पोटे भरतात, मनसोक्त (यथा+इष्ट) संतति निर्माण (प्रजा+उत्पादन) करतात. तर मग नरदेहाचे (मनुष्य योनीत जन्माला येण्याचे) काय महत्त्व? दोघांच्याही अवस्था (मनुष्य योनी आणि पशू योनी) सारख्याच की? (साम्यस्थिति उभयतां जैं). पिंडपोषण (शरीर पोसणे) आणि मैथुन (कामवासना भागविणे) हेच जर नरदेहाचे (नरदेह सार्थक करण्याचे) साधन असेल, हेच जर या जन्माचे अंतिम ध्येय (पर्यवसान) असेल तर तो नरजन्म निरर्थक (अर्था शिवायचा, फुकट) होय. आहार-निद्रादि चतुष्टय (खाणेपिणे, झोप घेणे, मैथुन आणि भय इत्यादि चार प्रकार) यांतच जर आयुष्याचा क्षय (व्यय किंवा वापर) होत असेल तर श्वाना-मानवात (कुत्री व माणसे) फरक (भेद) काय? विचार करून (विवेक) याचा निर्णय करा. हीच जर नरदेहाची सार्थकता (सफलता) तर तरुजन्मी काय न्यूनता? (वृक्षादिंच्या जन्माला येण्यात काय कमीपणा? भस्त्राही (लोहाराचा वारा घालून भट्टी पेटविण्याचा भाता) श्वासोश्वास करतो आणि कुत्रीही शरीराचे पोषण करतात. (श्वानाही शरीर-पुष्टता). मनुष्य प्राणी मुक्त (प्रपंचादि बंधनापासून मोकळा) आहे, तो स्वतंत्र असून (बांधलेला नसून) त्याला कसलीही भीती नाही आणि तो शाश्वत (अविनाशी) आहे याची जाणीव राहणे हीच या जन्माची सफलता (सार्थकता) होय. "मी कोठून आलो. मी कोण आहे." नरजन्माचे कारण काय?" या सर्वांचे जो मर्म (बीज) जाणतो तोच शहाणा (प्रवीण). त्याशिवाय सर्व फुकटचे श्रम (शीण सारा). (ओ. ९-१६)

जशी नंदादीपाची (देवापुढे अहोरात्र जळत ठेवण्याच्या दिव्याची) ज्योत (ज्वाळा) पेटविल्यापासून ते विझेपर्यंत (आदि+अंतीं) एकच दिसते परंतु क्षणाक्षणाला वेगळी असते तशीच (आपल्या) देहाची स्थिती असते. बाळपण तरुणपण आणि

म्हातारपण हे सर्व लोकांना उघड दिसतात. परंतु ते कोणालाही कधीही न कळता स्वाभाविकपणे जातात आणि येतात. ज्योत दिसते त्याचक्षणी नाश पावते. असा तिच्या स्थितीत सतत (अपरिमित) बदल होत असला तरी ती एकच भासते. त्याचप्रमाणे (आपला) देह जो या क्षणी असतो तो पुढच्या क्षणी नसतो तरी तो एकच भासतो. हा देह म्हणजे मलमूत्रांची न्हाणी (मोरी किंवा सांडपाण्याकरिता बांधलेली नाली) आहे, श्लेष्म-पूय-लाळींची घाणी (कफ, पू व लाळ या घाणेरड्या पदार्थांचे स्थान) आहे आणि याला मरण पावलोपावली (क्षणोक्षणीं) ठेवलेले आहे. असा हा (मानव देह) मोठा कुलक्षणी (अशुभ चिन्हांनी युक्त) आहे. हे मानवी शरीर कृमिकीटकांचे (पोटातील जंतांचे व किड्यांचे) घर आहे, शोणित (रक्त) व स्नायूंचा गाडा (ओझे वाहून नेणारे वाहन), अस्थि (हाडे) व चर्माचा (कातडीचा) सांगाडा (सांपळा. ज्याच्या आधाराने शरीराला आकार येतो), मूत्र व पूरीष (विष्ठा) या घाण वस्तूंचा (दुर्गंधीचा) राडा (खड्डा) आहे. खरोखरीच तो जीवाचा प्रत्यक्ष खोडाच आहे. (मनुष्य प्राण्यासाठी मोठी अडगळ किंवा गळ्यात लटकविलेले लोढणेच आहे). त्वचा (चामडी), मांस, रुधिर (रक्त), स्नायू, मेद (चरबी), मज्जा (हाडांतील आतली बाजू), अस्थि (हाडे), वायू (शरीरातील कफ, वात व पित्त या तीन धातूंपैकी वात म्हणजे वारा) आणि उपस्थ (जननेंद्रिय) व पायू (गुदद्वार) सारखी अमंगल (अपवित्र) अंगे (अवयवे) यासकट अल्पायु (थोडे आयुष्य असलेली) ही काया (मानवी शरीर) आहे. असा हा नरदेह जरी अमंगल, नश्वर (नाशिवंत) आणि क्षणभंगूर असला तरी सर्व मांगल्याचे ठिकाण (मंगलधाम) असा जो परमेश्वर तो याच देहामुळे हाती येत असतो. (ओ. १७-२४)

ज्याची नुसत्या कल्पेनेनेच भयंकर (दारुण) भीति वाटते असे जन्म-मरण सदाच पाठीशी लागलेले आहे. कानाला कान न लागताच (एकाएकी) हा प्राण निघून जाईल (मरण येईल). दिवस व रात्री कितीतरी येतात आणि जातात. कोण लक्ष ठेवतो मार्कंडेयाचे (प्राचीन काळातील एका ऋषीचे नाव. यांचे सारखा दीर्घायुष्य असलेला दुसरा कोणी पुरुष संसारात उत्पन्न झाला नाही असे मानले जाते) म्हणजे अति दीर्घ आयुष्य घेऊन जन्माला आलेल्यांनादेखील काळाची गती (मरण) चुकविता येत नाही. अशा क्षणभंगूर नरदेहात ज्यांच्या नामस्मरणाने पुण्य लागते (पुण्य+श्लोक) अशा संतांच्या कथा वार्ता करण्यात वेळ घालविला तरच तो गांठी (संग्रही) पडतो व बाकीचा याशिवायचा काळ वायाच (व्यर्थ) गेला, अशी निश्चित जाणीव झाली तरच जन्माला येऊन कल्याण (हित साधले जाते. परंतु अनुभव आल्याशिवाय (व्यतिरिक्त) असला विश्वास कोणालाही पटत नाही. हा अनुभव यावयाला मोठा (विभव) अभ्यास करावा लागतो. तरी पण शाश्वत (कायम टिकणाऱ्या) सुखाची इच्छा धरणाऱ्या जीवाने हे

वैभव (ऐश्वर्य) साधून घ्यावे. दारा (पत्नी), सुत (मुलगा), वैभव (श्रीमंती), वित्त (पैसा), (एवढेच काय) समुद्राने चहू बाजूंनी घेरलेल्या (समुद्र+वलयांकित) म्हणजे अमर्याद पृथ्वीचे राज्यही ईश्वरकृपेने प्राप्त झालेले असले तरी माणूस मनात अतृप्त (असंतुष्ट) असतो. शाश्वत (चिरंतन राहणारे) सुख व शांती प्राप्त करण्याचेच ध्येय चित्तात ठेवून (सर्व) प्राण्यांमध्ये परमेश्वर (भूती भगवंत) पाहणे हीच एक उपासना (उपास्ति) परमपदाची (मोक्षाची) प्राप्ती करून देते. त्वचा, मांस, रुधिर व हाडे यांना जोडून हा मानव देहाचा सांगाडा तयार केलेला आहे. त्याची परमार्थप्राप्तीसाठी मोठी अडगळ (खोडा) आहे. त्याचे ममत्व (माझेपण किंवा ममता) सोडून द्या. त्याला केवळ आपला चाकर (नोकर) माना. त्याला डोक्यावर बसवू नका. सतत (निरंतर) लाड पुरवू नका आणि त्याला नरकाचे (पापी लोकांना यातना भोगावयास लावण्याची यमधर्माची जागा) द्वार (नरकात जाण्याचे साधन) करू नका. त्याला निर्वाहापुरते अन्न व कपडे (आच्छादन) आणि तात्पुरते पालनपोषण (लालन पालन) देऊन जन्ममरण चुकविण्यासाठी आध्यात्मिक उन्नतीकडे लावा. जन्ममरणांसारखी मोठी अरीष्टे असलेला (अनर्थात्मक) व प्रत्येक क्षणी विनाशाकडे झुकलेला (विनाश+उन्मुख) असा जो निरंतर दुःखी नरजन्म; त्याचे क्षणिक सुख काय कामाचे? वीज (विद्युल्लता) पहा! आता आहे आता नाही. समुद्रावरच्या लाटा (सागर+तरंगता) क्षरभरच टिकतात. तसेच या देहाचे सुख क्षणिक (अल्पकाळ टिकणारे) असते. तरी आपण काही विचार करावा. देह (शरीर), गेह (घर), अपत्य (मुलेबाळे), स्त्री (पत्नी) व जन (इतर लोक) हे नाशवंत आहेत हे जाणून आणि मातापित्यांना (स्मशानाकडे) खांद्याने वाहून देखील (पोहोचवूनही) माणूस स्वतः आपण जागा होत नाही (उमजेना), मेल्यांच्या मागे खुशाल (स्वतःही) मरतो आणि जन्ममरणांचे फेरे फिरत राहतो परंतु ते (फेरे) कोणत्या मार्गाने (गुणे) आवरले जातील याचा क्षणभरदेखील विचार करत नाही. आपल्या (निज) कुटुंबाची भर (भरण-पोषण) करता करता आयुष्य भराभर जाते. काळ हा आयुष्याचे मोजमाप करण्यात तत्पर असतो. आपल्या कर्तव्याचा त्याला विसर नसतो. अखेरची घडी (वेळ) भरली की तो एक क्षणही (चिपडी) थांबत नाही. धीवर (कोळी किंवा मच्छीमार) जसा आपले मासे पकडण्याचे जाळे ओढतो (तसा काळ आपले जाळे ओढतो) व (त्यातील) जीव (माशाप्रमाणे) तडफडत तडफडत मृत्युमुखी पडतो. (ओ. २५-४०)

महाभाग्याच्या सुकाळामुळे (परवडी), कोटी पुण्य गोळा केल्यामुळे (वेंचूनिया पुण्यकोडी) हा नरदेह जोडला गेला आहे तरी ही योग्य संधी आलेली पाहून आपले ध्येय साधून घ्यावे (घडीनें घडी साधावी). भगीरथासारखे (सूर्य वंशातील सगर राजाचा पणतू. याने खडतर तपश्चर्या करून स्वर्गातून पृथ्वीवर व नंतर पाताळात गंगा आणली)

पराकाष्टेचे प्रयत्न (युक्ति) करूनही या नरदेहाची प्राती होत नाही. केवळ अदृष्ट (नशीबामुळे) हा अचानक (अवचट) हाती येतो. म्हणून तो व्यर्थ मातीत मिळवू नका. पुढील जन्मी करू म्हणाल तर एकदा हा हातचा गेला तर तोच पुन्हः खात्रीने मिळेल असे मानणे मूर्खपणाचे आहे. कित्येक पापी मनुष्य (देहवंत) पुरुषाच्या रेतात किंवा वीर्यात मिसळून (शुक्र+बीज+समन्वित) स्त्रीच्या जननेंद्रियात (योनिद्वारासी) आपल्या कर्मामुळे शरीर धारण (ग्रहण) करण्यासाठी येऊन दाखल होतात. कित्येक त्यापेक्षाही हलक्या (अधम) जंगमवर्गी (हालू फिरू शकणाऱ्या पशू, पक्षी, जलचर वगैरे योनीत) जन्म असून मागून आपल्या कर्मानुसार स्थावरभावाला (हालू फिरू न शकणाऱ्या वृक्ष, वेल वगैरे योनीला) प्राप्त होतात. जसे जसे ज्ञान मिळविले असेल (उपार्जित), जसे ज्याचे कर्माचे आचरण (अनुष्ठान) असेल, त्यानुसार त्याला शरीर प्राप्त होण्याचा हा योग घडून येणे हे श्रुतीला (वेदांना) मान्य आहे. **''यथाप्रज्ञं हि संभवा''** (स्वत:च्या ज्ञानाला म्हणजे आकलन शक्तीला अनुसरून जन्म प्राप्त होतो) असे वेदमाता (श्रुति माय) अति कळकळीने (कणवा) सांगते. जसा ज्याचा विज्ञानाचा सांठा (ठेवा) तसा त्या जीवाला जन्मही (जननही) प्राप्त होतो. ईश्वराची लीला (विंदान) कल्पनेच्या पलीकडे (अतर्क्य) आहे. त्याचे संपूर्ण ज्ञान प्राप्त करणे अशक्य आहे. एखाद्याला ते अंशमात्र जरी लाभले तरी तो नरदेह धन्य होय. थोर भाग्याने हा नरदेह, मोठ्या पुण्याईने ही ब्राह्मण जात आणि ईश्वरकृपेने हे साईंचे चरण प्राप्त होणे म्हणजे हा संपूर्ण अलभ्य (मिळण्यास अति कठीण असा) लाभ होय. अनेक प्रकारच्या पुष्कळ योनी (प्राण्यांच्या जाती) असल्या तरी त्यात मनुष्य-योनी सर्वांहून श्रेष्ठ आहे. आपण कोठून आलो. आपणाला कोणी निर्माण केले, ह्याचा सारखा विचार (विवेक-श्रेणी) मानव-योनीतच शक्य होतो. इतर योनी हे जाणत नसतात. त्या जशा उत्पन्न होतात (उपजती) तशाच नाश पावतात. आपल्या मागील (भूत), पुढील (भावी) किंवा वर्तमान अवस्थेची (गति) तशीच ईश्वराच्या अस्तित्वाची (स्थिती) त्यांना कल्पना नसते. (ओ. ४१-५१)

म्हणून हा नरदेह निर्माण करून ईश्वर आनंदयुक्त झाला कीं विवेक (नित्य व अनित्य, सत्य व असत्य यातील भेद जाणण्याचे ज्ञान) व वैराग्य (प्रापंचिक आकांक्षा व वैषयिक सुखांचा त्याग) स्वीकारून (वरून) नर (मनुष्य) माझे भजन करील. विनाशी नर मोक्षप्राप्तीसाठी व्रतवैकल्ये, मंत्रतंत्र, दानधर्म इ. साधने करेल. तर अविनाशी नारायण (परमेश्वर) होईल. नरदेहासारखी (सम) या सृष्टीवर (मोक्षप्राप्तीचे) साधन असलेली अशी (आणखी कोणती) वस्तू नाही. गारूडी (जादुगार) मोठा हुशार (चतुर) असतो. तो अडाणी माणसासमोर खेळ करत नसतो. आपल्या कुशलतेचे वर्म किंवा सार जो जाणू शकेल अशाच प्रेक्षकवृंदाची त्याला अपेक्षा असते. तसेच पशू, पक्षी,